सारांश :– ''अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे निर्देशक म्हणून शहरीकरणाकडे पाहिले जाते. सध्याच्या आधुनिक काळात शहरीकरणावर आर्थिक, सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय घटकाचा परिणाम आढळून येतो. यामध्ये औद्योगिकरण हा शहरीकरणावर परिणाम करणारा एक महत्वाचा आर्थिक घटक आहे. जिथे उद्योगांची स्थापना होते. तिथेच लोकसंख्या केंद्रीत होऊन शहराची निर्मीती होते. संपन्न देशात औद्योगिकरण आर्थिक विकास व शहरीकरण हया प्रक्रिया एकाच वेळी घडून येतांना दिसतात. नागपूर विभागात औद्योगिकरणाचे प्रमाण शहरीकरणाला चालना देणारे असल्याचे दिसून येते.''

अतिप्राचीन काळापासून जगामध्ये नगरे अस्तित्वात होती परंतु त्या काळात नागरीकरणाची प्रक्रिया प्रचलित नव्हती. शहरीकरणाची सुरूवात ख–या अर्थाने औद्योगिक क्रांती व दळणवळणाचा विकास झाल्यानंतर झाली.[1] आजच्या घडीला जिथे उद्योगांची स्थापना होते. तिथेच लोकसंख्या केंद्रीत होऊन शहराची निर्मीती होते. संपन्न देशात औद्योगिकरण आर्थिक विकास व शहरीकरण हया प्रक्रिया एकाच वेळी घडून येतांना दिसतात. म्हणून शहरीकरणाला आर्थिक विकासाचे सूचक मानले जाते.[2]

भारताच्या शहरीकरणाची तुलना जगातील औद्योगिकदृष्टया विकसीत देशाबरोबर केल्यास असे दिसून येते की, भारत जास्त उत्पन्नच्या देशांपेक्षा खूप मागे आहे. 2012 च्या जागतिक विकास अहवालानुसार 2010 सालचे भारताचे दरडोई उत्पन्न 1,270 डॉलर, अमेरिका 47,340 डॉलर, फॉन्स 42,370 डॉलर, जपान 41,850 डॉलर, स्वित्झरलॅड 71,520 डॉलर, ऑस्ट्रेलिया 46,200 डॉलर ऐवढे आहे.[3] या सर्व विकसीत देशाचे शहरीकरण सरासरी 80 टक्केपेक्षा जास्त झालेले आहे. तर भारताचे शहरीकरण 2011 च्या जनगणनेनुसार 31.16 टक्के झालेले आहे. याचा अर्थ विकसित देशाच्या मानाने भारतीय शहरीकरणाचा वेग कमी आहे. परंतु अलीकडे तंत्रज्ञान, औद्योगिकरण, दळणवळण, शिक्षण, सेवा यामुळे शहरीकरणाचा वेग वाढत आहे.[4] म्हणजे एखाद्या प्रदेशातील शहरीकरण विविध आंतरसंबंधित घटकांवर अवलंबून असते. हे घटक आर्थिक, सामाजिक व लोकसंख्या शास्त्रीय स्वरूपाचे असतात. या

सर्व घटकांचा एकत्रित शहरीकरणावर परिणाम झालेला आढळून येतो. यामध्ये शहरीकरणावर परिणाम करणा—या घटकांमध्ये औद्योगिकरण एक महत्वाचा आर्थिक घटक आहे.

आज जगातील सर्व देशांत औद्योगिकरण होत आहे. कारण औद्योगिकरण कोणत्याही राष्ट्राच्या प्रगती व संपन्नतेचा केवळ आधारच नाही तर त्याच्या आर्थिक विकासाचा मापदंड पण आहे. परंपरागत अवस्थेमध्ये देशातील बहुसंख्य लोकसंख्या कृषी व इतर प्राथमिक व्यवसायाकडे सलग्नीत असते. औद्योगिकरणाच्या प्रगती बरोबर या प्रमाणात क्रमशः घट होऊ लागते. लोकसंख्या हळूहळू ग्रामीण कृषी क्षेत्राकडून शहरी उद्योग क्षेत्राकडे वळू लागते.[5] म्हणून शहरीकरणावर परिणाम करणा—या आर्थिक घटकापैकी एक महत्वाचा घटक म्हणून औद्योगिकरणाला महत्व दिले जाते. शहरी भागात विविध उद्योगांचा विकास व केंद्रीकरण मोठया प्रमाणावर झालेले असते. त्यामुळे अशा प्रदेशात रोजगारीची संधी मोठया प्रमाणावर निर्माण होते. थोडक्यात औद्योगिकरण शहरीकरणाला जन्म देते. कारण बहुतांश उद्योग शहरांमध्ये स्थापीत होतात.[6] ज्या प्रदेशात औद्योगिकरण मोठया प्रमाणात झालेले असेल त्या भागात शहरीकरणाची प्रक्रिया विशेष कार्यान्वीत झालेली दिसते.

नागपूर विभागातील औद्योगिकरणाचा अभ्यास करण्यासाठी चालू कारखाण्यांची संख्या व त्यातील कामगारांची संख्या या निकषाचा वापर करण्यात आला आहे.

**चालु कारखाने आणि त्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या (टक्केवारीत)**

| जिल्हा / विभाग / राज्य | चालू कारखाण्याची संख्या | कामगारांची दैनिक सरासरी संख्या | राज्यामध्ये / विभागामध्ये चालू कारखाण्याच्या संख्येचे प्रमाण | राज्यामध्ये / विभागामध्ये कामगाराच्या दैनिक सरासरी संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| विभाग : | | | | |
| कोकण | 14,084 | 6,29,996 | 45.88 | 49.19 |
| नाशिक | 3,301 | 1,42,488 | 10.75 | 11.20 |
| पुणे | 8,290 | 3,29,273 | 27.00 | 25.71 |
| औरंगाबाद | 1,510 | 71,065 | 4.92 | 5.55 |
| अमरावती | 1,420 | 28,322 | 4.63 | 2.21 |
| नागपूर | 2,092 | 78,663 | 6.81 | 6.14 |
| विदर्भ | 3,512 | 1,06,985 | 11.44 | 8.35 |
| महाराष्ट्र राज्य | 30,697 | 12,80,807 | 100.00 | 100.00 |
| जिल्हे : | | | | |
| वर्धा | 128 | 8,236 | 6.12 | 10.46 |
| नागपूर | 1,455 | 49,411 | 69.55 | 62.81 |
| भंडारा | 130 | 4,101 | 6.21 | 5.21 |
| गोंदिया | 112 | 1,428 | 5.35 | 1.82 |
| चंद्रपूर | 206 | 14,191 | 9.85 | 18.04 |
| गडचिरोली | 61 | 1,296 | 2.92 | 1.65 |
| नागपूर विभाग | 2,092 | 78,663 | 100.00 | 100.00 |
| आधार : महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी, 2006 | | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, 2006 मध्ये महाराष्ट्र राज्यातील चालू कारखाण्याची संख्या 30,697 आहे व त्यातील कामगारांची संख्या 12,80,807 एवढी आहे. राज्याच्या एकूण चालू कारखाण्याच्या व त्यातील कामगारांच्या संख्येमध्ये कोकण विभागाचा वाटा अनुक्रमे 45.88 व 49.15 टक्के आहे. नाशिक विभागाचा 10.75 व 11.20 टक्के, पुणे विभागाचा 27.00 व 25.71 टक्के, औरंगाबाद विभागाचा 4.92 व 5.55 टक्के, अमरावती

विभागाचा 4.63 व 2.21 टक्के आणि नागपूर विभागाचा 6.81 व 6.14 टक्के आहे. अमरावती व नागपूर विभाग मिळून विदर्भाचे राज्याच्या एकूण चालू कारखाण्याच्या व त्यातील कामगारांच्या संख्येमध्ये प्रमाण अनुक्रमे 11.44 व 8.35 टक्के आहे. कोकण विभागातील चालू कारखाण्याची संख्या व त्यातील कामगारांची संख्या नागपूर विभागाच्या तुलनेत अधिक आहे. मात्र औरंगाबाद व अमरावती विभागातील चालू कारखाण्याची संख्या व त्यातील कामगारांची संख्या नागपूर विभागाच्या तुलनेत कमी आहे. यावरून कोकण विभागाच्या तुलनेत नागपूर विभागात औद्योगिकरणाचे प्रमाण कमी आहे. तर औरंगाबाद व अमरावती विभागाच्या तुलनेत औद्योगिकरणाचे प्रमाण अधिक आहे. तसेच औद्योगिकरण अधिक असलेल्या कोकण विभागात शहरीकरणाचे प्रमाण अधिक आहे आणि औद्योगिकरण कमी असलेल्या औरंगाबाद व अमरावती विभागात शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. नाशिक व पुणे विभागातील चालू कारखाने व त्यातील कामगारांची संख्या नागपूर विभागाच्या तुलनेत अधिक आहे. यावरून या दोन विभागात औद्योगिकरणाचे प्रमाण नागपूर विभागापेक्षा अधिक आहे. मात्र नागपूर विभागातील शहरीकरण नाशिक विभागापेक्षा अधिक आहे व पुणे विभागाच्या बरोबरीला झालेले आहे. नाशिक व नागपूर विभागाची तुलना करता नाशिक विभागात औद्योगिकरणाचे प्रमाण अधिक असूनही शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. याउलट नागपूर विभागात औद्योगिकरणाचे प्रमाण कमी असूनही शहरीकरणाचे प्रमाण अधिक आहे. तसेच पुणे विभागात औद्योगिकरणाचे प्रमाण अधिक असूनही या विभागाचे व नागपूर विभागाचे शहरीकरण जवळपास सारखे आहे. यावरून नागपूर विभागाच्या शहरीकरणासाठी औद्योगिकरणाशिवाय इतर घटक जबाबदार आहेत.

नागपूर विभागातील चालू कारखाण्याची संख्या व त्यातील कामगारांची संख्या अनुक्रमे 2,092 व 78,663 आहे. नागपूर विभागातील एकूण चालू कारखान्यांच्या संख्येमध्ये व त्यातील कामगारांच्या संख्येमध्ये नागपूर जिल्हयाचे प्रमाण अनुक्रमे 69.55 व 62.81 टक्के आहे. याशिवाय वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील चालू कारखाण्याच्या संख्येचे प्रमाण अनुक्रमे 6.12, 6.21, 5.35, 9.85 व 2.92 टक्के आहे. तसेच या जिल्हयातील कारखाण्यातील कामगारांच्या संख्येचे प्रमाण अनुक्रमे 10.46, 5.12, 1.82, 8.04, 1.05 टक्के आहे. नागपूर जिल्हयात चालू कारखाने व त्यातील कामगारांची संख्या अधिक आहे. म्हणजे या जिल्हयातील औद्योगिकरणाचे प्रमाण विभागात सर्वाधिक आहे. त्यामुळे या जिल्हयात शहरीकरणाची प्रवृत्ती पण अधिक आहे. यानंतर चंद्रपूर जिल्हयाचा उल्लेख करावा लागेल. चंद्रपूर जिल्हयातील औद्योगिकरण भंडारा, गोंदिया, वर्धा व गडचिरोली जिल्हयाच्या तुलनेत अधिक आहे. त्यामुळे या जिल्हयातील शहरीकरणाचे प्रमाणही या जिल्हयांच्या तुलनेत अधिक आहे. विभागामध्ये गडचिरोली जिल्हयातील चालू कारखाण्यांची संख्या व त्यातील कामगारांची संख्या सर्वात कमी आहे. यावरून या जिल्हयातील औद्योगिकरण कमी झाले असून या जिल्हयात शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. थोडक्यात नागपूर विभागात ज्या जिल्हयात औद्योगिकरण अधिक आहे. त्या जिल्हयामध्ये शहरीकरणाची प्रवृत्तीपण अधिक असल्याची याउलट ज्या जिल्हयात औद्योगिकरण कमी आहे त्या जिल्हयामध्ये शहरीकरणाची प्रवृत्तीपण कमी असल्याची दिसून येते.

**संदर्भ**


1. घारपुरे विठ्ठल (2005) : ''लोकसंख्या भूगोल'', पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर. P - 238.
2. मिश्र एस. के. व पुरी पी. के. (2003) : ''भारतीय अर्थव्यवस्था'', हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई. P - 113.
3. World Development Report (2012) : Published for the World Bank, Oxford University Press, New York. (worldbank.org)
4. पुराणिक माधव (2005) : ''भारताचा भूगोल'', विद्या प्रकाशन, महाल, नागपूर. P. 106.
5. कुलश्रेष्ठ आर. एस. (2004) : ''औद्योगिक अर्थशास्त्र'', साहित्य भवन पब्लिकेशन्स्, आगरा. P. 15.
6. मदन जी. आर. (2005) : ''विकास का समाजशास्त्र'', विवेक प्रकाशन, जवाहर नगर, दिल्ली. P. 18.

# अंबागड किल्ला : भंडारा जिल्हयातील ऐतिहासीक वास्तू

**डॉ. सुनिल चवळे,** अंशकालीन प्राध्यापक, एन. जे. पटेल महाविद्यालय, मोहाडी जि. भंडारा

इतिहासाची साक्ष देणारा, अंबागड किल्ला सातपुडा पर्वत रांगेत मोडत असून या भागातील लष्करी महत्व लक्षात घेता बख्त बुलंदशाह याने शिवणी येथील गव्हर्नर राजखान पठाण यांच्या हस्ते इ. स. 1700 च्या सुमारास बांधुन घेतला.[1] किल्ला मूळ स्वरूपात नसला तरी अवशेष स्वरूपात शिल्लक आहे. अंबागड किल्ल्याच्या इतिहासाची साधने फारसी उपलब्ध नाहीत. तसेच त्याचा अधिकृत असा इतिहास उपलब्ध नाही.

सातपुडा पर्वताच्या कुशीत असलेला अंबागड किल्ला तुमसरच्या वायव्येस 14 कि.मी. अंतरावर आहे. सातपुडा पर्वताच्या रांगेत 300 ते 400 फूट उंचावर किल्ला आहे. या डोंगराच्या पायथ्याशी अंबागड नावाचे आदिवासी (गोंडांचे) गाव आहे. या परिसरात आंब्याच्या झाडांची विपुलता असल्यामुळे या किल्ल्याला अंबागड किल्ला नामकरण झाल्याची नोंद भंडारा गॅझेटर मध्ये आहे.

किल्याची उत्तर–दक्षिण दिशा सुरक्षित असून, पूर्व–पश्चिमे कडे तटबंदी केलेली आहे. किल्ल्याच्या बांधणीसाठी वालुकाश्म दगडाचा व विटांचा वापर करण्यात आला. हा किल्ला दोन भागात विभागलेला असुन किल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ 46045 चौरस मीटर असुन, पूर्वेस 85 मीटर, पश्चिमेस 80 मीटर दक्षिणेस 40 मीटर तर उत्तरेस 55 मीटर आहे. किल्ल्याच्या चतु:र्सिमा पूर्वेस बावनथडी कालवा, बंदरझीरा, पश्चिमेस पार्वतीचा हिवर (गुफा) व इ.स. 9 व्या शतकातील गायमुख देवस्थान असून दक्षिणेस जुना अंबागड व रामपूर तलाव तर उत्तरेस बघेडा तलाव आहे.

अंबागड किल्ला सुमारे 10 एकर परिसरात पहाडावर स्थित आहे. किल्ल्यावर जाण्याकरीता सुमारे 500 पायऱ्या आहेत. सातपुडा पर्वताच्या उभ्या डोंगराची चढण पार केल्यानंतर निसर्गाचा आनंद लुटतच किल्ल्याच्या प्रवेश व्दारा जवळ पोहचता येते. पूर्वी किल्ल्याच्या प्रवेश व्दारावर गोंडि राजचिन्ह होते. पांडेमहल भंडारा येथे महाला करीता वापरलेला लाकडी दरवाजा अंबागड किल्याचा आहे. किल्ल्याचा भव्य परकोट व बुरूज आजही अस्तित्वात आहे. येथे लहान मोठे 10 बुरूज प्रत्येक कोपऱ्यात असून, शत्रुंवर गोळयांचा मारा करण्याकरीता बनवलेली त्रिकोणी छिद्रे आहेत. 5 बुरूजांवर तोफ ठेवण्याची सोय होती.

किल्ल्याच्या प्रवेशव्दारा जवळ दोन मोठे बुरूज असून या बुरूजांची उंची 30 फूट आहे. बुरूजांच्या पायथ्याजवळील व्यास 32 फूट असून बुरूजांचा वरचा व्यास 26 फूट आहे. हे बुरूज विटा–चुना याने बांधलेली आहेत. किल्ल्याच्या भिंती दोन फुट रूंदीच्या आहेत. प्रवेशव्दार उत्तम अवस्थेत आहे. प्रवेशव्दारातून आत गेल्यास समोरच कमानी असलेल्या खोल्या दिसतात या खोल्या सैनिकां करीता बांधलेल्या असाव्यात, कमानीवर उत्तम नक्षीकाम आहे. दोन बुरूजांवर दोन मिनार असून ते दहा फुट उंचीचे आहे. हा किल्ला अनेक स्तरीय असून, प्रवेशव्दारातून आत गेल्यास किल्ल्याचे पडके अवशेष दृष्टीस पडतात. त्यावरून त्या काळात हा किल्ला किती भव्य दिव्य असेल हे लक्षात येते. येथील ऐतिहासीक सामुग्रीही नष्ट झाली असुन एकेकाळी येथे रसोईखाना, राहण्याकरीता खोल्या, सभामंडप होता. राणीचे स्नानगृह टाका ही वास्तू आजही त्या वैभवाची साक्ष देतो. मसाला पिसाई चक्का व हातीखाना आज साबुत आहे. येथे मोठया प्रमाणावर हत्ती घोडे राहत होते. हा प्रदेश हत्ती बहुल प्रदेश होता. हत्तीच्या पायांची चिन्हे, आजही दगडांवर अंकित आहेत. बख्तबुलंदचे प्रिय घोडे हिरा, पन्ना व चंदा येथेच राहत होते.[2]

किल्ल्याच्या पश्चिमेस एक मोठे टाके नैसर्गीक पाणी साठविण्या करीता आहे. या पाण्याचा वापर पिण्याकरीता होत असे. किल्ल्याचा वरचा मजला 20 ते 25 फुट उंच आहे. त्यावर दिवाणखाना व इतर इमारती असाव्यात त्याचे अवशेष आजही दिसतात. इमारती खाली तळघर आहे. तळघरात अंधारातून पायऱ्याने उतरावे लागते. तळघराची लांबी 30X12 फुट तर उंची 21 फुट आहे.

तळघराची फरशी संगमरवर दगडांची आहे येथे चार नक्षीदार कमानी आहेत. त्या ठिकाणी तिरप्या झरोख्याव्दारे हवा व प्रकाश तळघरात येतो. तळघरात शस्त्रे, खजिना, ठेवीत असावे. अट्टल गुन्हेगारांना अंधार कोठडीत ठेवण्याकरिता या तळघराचा वापर होत असावा.[3] धर्माजी भोसले यास याच तळघरात अतिशय अमानुष वागणूक दिली जावून ठार मारण्यात आले होते. या ठिकाणी दगडाने बुजविलेला दरवाजा आहे. या ठिकाणाहून भुयारी मार्ग थेट रामटेक पर्यंत जात होता. अशी दंतकथा या भागात प्रचलीत आहे. त्या काळी अंबागड किल्ला व नागपूरच्या महालातील गोंड किल्ल्यात संमांतर दीप ज्योतीची व्यवस्था होती.[4]

नागपूरकर भोसलेंच्या काळात तुरूंग म्हणून या किल्ल्याचा वापर होत असे. या किल्ल्यावर 1639 ते 1818 पर्यंत भोसल्यांचा अधिकार होता.[5] अंबागड किल्ल्याच्या पायथ्याशी हनुमानाचे मंदिर असून, ते भोसले कालीन असावे. किल्ल्या लगतच्या भागात पूर्वी वसाहत होती. ब्रिटीश काळापर्यंत अंबागड हा स्वतंत्र परगणा असून, प्रशासकीय केंद्र होते. भंडाऱ्याचे प्रसिद्ध मालगुजार गणपतराव पांडे यांनी काही काळ किल्ल्याची देखरेख केली. ब्रिटीश काळात मोहाडी येथील कडू पटेल नावाचा कोष्टी यास अटक करण्यात येवून किल्ल्यातील अंधार कोठडीत ठेवले असता तो तिथे मरण पावला त्याला डोंगराच्या पायथ्याशी पुरण्यात आले. तेथे दगड ठेवून लोक पूजा करू लागले. आपला आजार बरा व्हावा. म्हणून लोक कडू पटेल यास नवस करून आजही कोष्टी लोक कोंबडा–बकऱ्यांची बळी देतात. यालाच लोक अंबागडया देव म्हणतात.[6]

जमिनी पासून सुमारे दीड हजार फूट उंचीवर अत्यंत गर्द व घनदाट अरण्यात हा किल्ला निसर्गाच्या सानिध्यात आहे. चारही दिशांना हिरव्यागार सातपुडयाच्या पर्वत रांगा व निसर्गाने नटलेला हा किल्ला प्रेक्षणीय आहे. जवळच बंदरझिरा नावाचे मुस्लीम देवस्थान असून लगतच गायमुख तिर्थक्षेत्र असून ते 9 व्या शतकातील आहे. नवीन अंबागड येथे त्या काळातील मुस्लिम मस्जिद असून अंबागड चौकात विरगलाचे अवशेष आहे. गुराखी लोक आस्थेने त्याची पुजा करतात. इतक्या मोठया प्रमाणात वास्तू व तटबंदया असलेले किल्ले महाराष्ट्रात फार थोडे आहेत. अनेक पर्यटक या ठिकाणी भेटी देतात. अंबागड किल्ला राज्य पुरातत्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे. येथे पुरातत्व विभागाने खोदकाम केल्यास भूकंपामध्ये गळीत झालेले जूणे अंबागड उत्खननाध्ये निघण्याची शक्यता आहे. अंबागड पायथ्याशी काही वर्षापूर्वी तलावाचे खोदकाम झाले असता पितळी ग्लास, बादली, भगवान गौतम बुद्धाची संगमरवरी मूर्ती, ब्रिटीशकालीन नाणे प्राप्त होवून ते शासनदरबारी जमा करण्यात आले होते. आजच्या परीस्थितीत गुप्त धनाच्या लालसेने परीसरातील लोक किल्याचे अस्तित्व धोक्यात आनत आहेत. राजे बख्तबुलंदशाह यांच्या राज्याची ग्वाही देत कधीकाळी रूबाबात उभा असलेला, राज्याला खंबीर आधार देणारा अंबागड किल्ला आज असहाय झाला आहे. पुरातत्व विभागाने व स्थानिक लोक प्रतिनीधींनी त्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

**राजखान पठाण** :– राजखान रोहीला बख्तबुलंदचा सुप्रसीद्ध सरदार होता. शिवणी येथे त्याची जहांगीरी होती. डोंगरतालाचा सुभेदार, भंडारा जिल्हयातील राजोली गावाचे वतन त्याच्या कडे होते. तो शिवणीचा दिवान होता. वास्तुशास्त्रज्ञ राजखान पठाण याने इ.स. 1700 मध्ये अंबागड व इ.स. 1704 मध्ये सानगडी हे दोन किल्ले बांधले. राजखान चे थडगे सानगडीच्या (साकोली तालुका) प्रवेश व्दारा समोर असून प्रतापगड किल्ला त्याच्या ताब्यात होता.

**संदर्भ साधने** :–

1) रसेल आर. वी. भंडारा जिल्हा गॅझेटर 2003 पृ.180
2) लोकमत नागपूर आवृत्ती 30 ऑक्टोंबर 2007
3) भोज एम. बी. रघुजी भोसल्यांची देवगढवर स्वारी –1979 पृ.66
4) अंधारे भा.रा. देवगडचे गोंडराजे हिंदी मराठी प्रकाशन नागपूर –2004 पृ.89
5) कित्ता
6) रसेल पृ.180

# स्त्री भ्रुण हत्या व भारतातील लिंगभेदाची समस्या

**प्रा. मीनाक्षी बेसेकर**, समाज शास्त्र विभाग, जी.बी.महीला महाविद्यालय, तुमसर

संत ज्ञानेश्वरांनी वर्णिलेली ''वसुधैव कुटूंबकम्'' ही संकल्पना प्रत्यक्षात येत आहे. जग केवळ जवळ येत नसुन झपाट्याने जवळ येत आहे. वैश्विकरणाची प्रक्रिया भारतीय नागरीकांच्या आंगवळनी होत चालली आहे. सहाजीकच भारताची तुलना इतर देशांबरोबर केली जात आहे. आणि तुलना म्हटलं की स्पर्धा आलीच या स्पर्धेत विविध क्षेत्रामध्ये भारताने मजल मारली यावरून भारताचे स्थान अधोरेखीत होते. अशाच एका आंतरराष्ट्रीय संस्थेने सर्वेक्षण करूण भारतीय महीलांची स्थीती दर्शविली आहे. यामध्ये भारताचे स्थान एकदम निम्न पातळीवर घसरलेले आहे.

म्हणूनच आज भारताला एका विचीत्र समस्येने ग्रासले आहे ती समस्या सामजीक आहे, वयक्तिक आहे, राष्ट्रीय आहे. परंतू त्या समस्येच्या पाहीजे त्या प्रमाणत अजुनही विचार केल्या जात नाही. ती समस्या म्हणजे स्त्री भ्रुण हत्या. आज आपल्या भारतातील नावजलेली तसेच देशाला लाजवीनारी ही समस्या आहे या देशाला ''आई पाहीजे, बहीन पाहीजे, बायको पाहीजे, मग मुलगी का नको'' ?

**लिंग विषमताः–** भारतीय संस्कृती मध्ये स्त्री महीमा गायली जाते तीची पौराणीक तसेच वैदीक काळात स्त्रीयांना अत्यंत मानाचे स्थान आहे. प्राचीन धर्म ग्रंथामध्ये स्त्रीचा उल्लेख महीला शक्ती मही किंवा पृथ्वीच पालन करू शकनारी महान शक्ती, महीषासुरमर्दीनी दुर्गा, तसेच इतिहासात धर्मकन्या, धर्मपत्नी, सीता, द्रोपदी गार्गी, कात्यायनी, सावीत्रीबाई फुले, अहील्याबाई होळकर, बहीनाबाई चौधरी, मदर तेरेसा, इंदिरा गांधी, किरण बेदी, लता मंगेशकर, कल्पना चावला, पी.टी. उषा, प्रतिभाताई पाटील, मृनाल गोरे यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. कन्याची पुजा केली जाते. स्त्रीचा दैदिप्यमान इतिहास असतांनाही स्त्रीच्या जन्मावर प्रश्न चिन्ह का....? याला कारण विज्ञान (Sceince) या विज्ञानामुळे देशाला वरदान मिळाले तर गर्भजल परिक्षण, गर्भलिंग निदान. हा ही विज्ञानाचाच एक चमत्कार आहे. या चमत्कारामुळे या समृध्द भारतात दररोज 2000 स्त्री भ्रुण मारले जातात. मुंबई शहरात 76 हजार गर्भपात एका वर्षात होतात त्यात स्त्री भ्रुणाचे प्रमाण 80 : इतके आहे. स्त्रीयांचे प्रमाण पुरूषाच्या तुलनेत 2011 ला 940 होते.

**भारतातील लिंग भेद :–** समाजात स्त्री आणि पुरूष दोघांचेही समान महत्व आहे. समाजाचा सर्वांगिण विकास तेव्हाच शक्य होऊ शकतो जेव्हा व्यक्तीच्या विकासात मानवाधिकाराची भुमीका सार्थक स्वरूपात लागु केल्या जाईल सभ्य अशा समाजात शारिरीक आणि मानसिक दृष्टीकोणातुन स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण केल्या गेले तरच समाजातील संस्कृतीचे रक्षण होऊ शकेल. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या आणि चौथ्या अनुच्छेदात मानवाधिकारांना संविधानीक स्थिती प्राप्त झाली आहे. विषेश म्हणजे या पुरूषप्रधान भारतीय समाजात स्त्रियांच्या मानवाधिकार संरक्षणासाठी संवैधानीक स्थितीचा लाभ स्त्रि उध्दार विषयक जनजागृतीचे कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना तसेच गैरशासकीय स्त्रिविकास चळवळींना कितपत झाला ? हा प्रश्नच आहे.

भारताला स्वतंत्रता प्राप्त होवून 65 वर्ष पूर्ण झाली परंतू आजही भारतीय स्त्रिच्या सामाजीक राजकीय आर्थिक शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थितीच्या आढावा घेतल्यास धक्कादायक चित्र समोर येते. उदाहरणादाखल पाहील्यास भारतातील ओरीसा आणि बिहार राज्यात दरवर्षी 13 लाखपेक्षा जास्त मुलींची भृण हत्या होते. आजही महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे 93–94 टक्के निकाल पोलिसांच्या चौकशीच्या त्रृटीमुळे व इतर गैर कारणामुळे अपराध्याच्या बाजूने लागतात. त्यामुळेच गुन्हेगारच्या मनात कायदेशिर भिती राहीली नाही स्त्री म्हणुनच तीची विटंबना होत आहे पुरूष आणि स्त्री ही लिंगविषमता स्त्रियांवर अत्याचार करीत आहे.

एकीकडे स्त्रीला देवी म्हणून तिची पुजा केली जात असली तरी परिस्थिती नुसार सारख्या देवीलाही स्वतःचे घर सोडावे लागले. प्राचीन काळापासूनच स्त्रीयांना समाजात दुय्यम वागणूक मिळत आली आहे. तिला आपल्या अधिकाराप्रती अधिक संघर्ष करावा लागत आहे.

**भारतीय संविधान आणि मुलभूत हक्कः–** प्रत्येक व्यक्तीला काही मुलभूत हक्क प्रत्येक व्यक्तीला काही मुलभूत हक्क आणि अधिकार आणि स्वातंत्र एक मुल्य आहे. स्वांतत्र आणि अधिकार अमर्याद नसतात. त्यावर कालमान परिस्थिती प्रमाणे मर्यादा, वाजवी बंधने घालावी लागतात पण ही बंधने फक्त स्त्री साठीच असतात. स्त्री पुरूषाची कर्तव्ये स्पष्टपणे अधोरेखीत करणे सहज शक्य व्हावे आणि प्रत्येक हक्काच्या आधी पार पाडावयाच्या कर्तव्याशी जोडी लावने ही शक्य व्हावे ज्या हक्कांची कर्तव्याशी अशी सांगड घातलेली नसेल तर ते हक्क म्हणजे बलवानाने कान पिळऩ्याचाच प्रकार असेल. आणि म्हणून हक्कासाठी संघर्ष करणे. व्यर्थ असेल. असेच होत

आले आहे. स्त्री पूरूष ही लिंगविषमता निर्माण झाली आहे. पूर्वी होती आजही ती तशीच आहे.

**लींग विषमताः–** लींग हा गुणविशेष निसर्गदत्त आहे असा लिंग या संज्ञेचा जिवशास्त्रीय अर्थ आहे. लिंग या शब्दासाठी Sex व Gender हे दोन पर्यायी शब्द आहेत. Sex हा शब्द जिवशास्त्रिय दृष्टया वापरला जातो. तर Gender हा शब्द सामाजीकरणाच्या संदर्भात वापरला जातो. उदा. स्त्रीच्या जातीत जन्माला आल्यामुळे एखाद्या व्यक्तिचे लिंग स्त्रि लींग असे आपण म्हणतो.

लींगाधिष्ठीत असमानतेची समस्या केवळ भारतात आहे असे नाही. अमेरीके मध्ये (समाजाचे अध्ययन करणारे सभासद नमूद करतात) अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी स्त्री उमेदवार असल्यास असंख्य पूरूष मतदार मतदान करण्याच्या प्रक्रीयेत सहभागीच होत नाहीत. अमेरीकन अध्यक्ष पदासाठी एक ही स्त्री आजपर्यंत निवडणूकीसाठी उभी राहीली नाही. आजही प्रगत देशातील पुरूषाएवढा मान सन्मान तिला मिळत नाही.

लिंगभेदावर आधारलेल्या या समाजव्यवस्थेत पुरूषांच्या व स्त्रियांच्या कर्तृत्व त्याच्या कार्यावर तर स्त्रिचे कर्तृत्व तिच्या शरिरावर जोखले जाते ''अन्यायी समाज व्यवस्थे विरूध्द माझा लढा आहे पुरूषांविरूध्द नाही'' अशा प्रकारे बिनधास्त विधान करणाऱ्या कट्टर निर्भीड स्त्रीवाद लिखानामुळे वादग्रस्त ठरलेल्या जेलिनेकला 2004 ला साहीत्य क्षेत्रातिल मिळालेल्या नोबल पुरस्कारामूळे तिला आनंद होण्यापेक्षा ती जास्त अस्वस्थ झाली कारण तिला लोकांचे लक्ष स्वतःकडे नाही समाजाकडे वेधायचे होते. पण तसे झाले नाही प्रसिध्दी पासून दूर राहनाऱ्या एल्फीड लेलिनेक यांना पुन्हा 2009 साली पुन्हा साहीत्य क्षेत्रातील नोबेल पुरस्काराने सन्मानित केले गेले.

स्त्री पूरूष समानतेची भाषा बाळगना–या या देशात स्त्री भ्रुण हत्येची असमानतेची समस्या का ?

**विभीन्न काळातील स्त्रीयांची स्थीतीः–**

1) वैदिक काळ :– हा काळ प्रर्दिघ चार हजार वर्षाचा असावा इ.स. पूर्व 6000 वर्षा पर्यंतच फक्त याच काळात स्त्रियांची स्थिती केवळ चांगलीच नाही तर अत्यंत प्रगत होती. कारण या काळात समानता होती. पत्नीच्या रूपात तिचा दर्जा श्रेष्ट होता ते घर नाही ज्या दारात पत्नी नाही गृहीनी विरहीत हे घर असेल ते जंगल आहे. स्त्री पूरूष संयुक्त पणे यज्ञ करीत होते. स्त्रीयांना उपनयन संस्कार पूरूषांप्रमाणे आपत्यक मानला जाई. म्हणजेच एकमेकांचे पूरक मानले जात होते.

2) उत्तर वैदिक काळ :– वैदिक काळातील चांगला व प्रगत दर्जा फार टिकला नाही. इ.स. पूर्व 700 ते इ.स. 600 वर्ष हा काळ मानल्या जाते. इ.स. 300 नंतर झालेल्या सामाजीक बदलामुळे स्त्रियांकडे बंघण्याचा दृष्टीकोण बदलला. रामायण माहाभारताचा हा काळ समजण्यात येतो. विवाहाला दैविक बाब मानण्यात येऊ लागली आणि स्त्री चारीत्र्यावर अधिक संवेदनशिलता निर्माण झाली. तिच्या शिक्षणात बाधा निर्माण झाली. वेद पठनाचे ज्ञान शक्य झाले नाही. तिला धार्मिक कार्यात संधी नाकरण्यात आली. पूत्र प्राप्तीला महत्व दिल्या जाऊ लागले. आणि स्त्रीयांचा दर्जा आणखी खालावत गेला.

3) स्मृतीकाळ :– इ.स. 600 ते 1000 वर्षा पर्यंतचा काळ या काळात स्त्रीचा दर्जा वेगाने ढासळू लागला. जो मान मानसन्मान होत होता. तो फक्त मातेच्या रूपातच. पत्नीच्या भुमीकेला तुच्छ मानले जाऊ लागले. स्मृतीकारांच्या निर्देशानुसार स्त्रीयांना स्वतंत्र सोडण्यास मनाई होऊ लागली. स्त्रीचे परम कर्तव्य पतीची सेवा. स्त्री ही मानसीक दृष्टया पूरूषापेक्षा कनिष्ठ ही धारणा निर्माण झाली.

4) मध्ययुगीन काळ :– या काळातही स्त्रियांची अधिकच अवनती झाली. ब्राम्हणांनी हिंदू धर्माचे रक्षण, स्त्रियांचे सतित्व आणि स्वतःची शुध्दता राखण्यासाठी, स्त्रियांसबंधीचे नियम आणखी कठोर केलेत. उच्च जातीतील स्त्रियांचे शिक्षण सुध्दा बंद केले. देवदासी, बालविवाह, कुमारीविवाह पध्दती याच कालावधीत 9 वर्षाच्या रमाबाईचे लग्न 45 वर्षाच्या पूरूषाशी झाले होते. एंकदरित या काळात हिंदूनी जन्मापासून मृत्यू पर्यंत पूरूषाच्या स्वाधीन केले आणि स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावल्या गेले.

5) ब्रिटीश अथवा आधूनिक काळ :– या काळातही स्त्रीयांची स्थिती दयनीयच होती. परंतू ब्रिटीशांच्या उदारतावादी धोरणामुळे स्त्रियांची स्थिती सुधारत असल्याचा खुना सापडतात. ब्रिटीशांनी सती पध्दत कीती अमानूष आहे हे पटवून दिले. याच कालावधीत अनेक समाज सुधारकांनी स्त्रीयांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आनण्याचा प्रयत्न केला. स्त्रीयांमध्ये जागृती निर्माण होऊ लागली पण पाहीजे त्या प्रमाणात सुधारणा होऊ शकली नाही. त्या काळात जी स्थिती होती ती आजही आहे. आदिवासी स्त्रीयांच्या दर्जा संबंधी सुशिक्षितांमध्ये एकमत आढळून येत नाही. या समाजात स्त्रियांना कनिष्ठ दर्जा दिला जात असून तिला गुलामासारखे किंवा एखाद्या ओझे वाहणाऱ्या जनावरासारखे वागवण्यात येते असे म्हटले जाते. तर काही आदिम समाजात ती घरची स्वामीनी समजण्यात येऊन तीला पुरूषासारखी समानेतची वागणूक दिली जाते असेही काहींचे मत आहे. दोन्ही प्रकारच्या मतात भीन्नता आहे. कारण वंश परंपरेनूसार अशी वागणूक बघायला मिळते. मातृवंश परंपरेतही जर स्त्रिला

मानाची वागणूक मिळत नसेल तर त्या परंपरेला काय महत्व ?

प्रत्येक काळात स्त्रियांची स्थीती किती दयनिय आहे ते उपरोक्त विवेचनावरून लक्षात येते परंतू वरील सर्वच काळात स्त्रियांना कनिष्टतेची वागणूक दिली जात असली. तरी स्त्रीला जन्म घेण्याचा अधिकार नाकारला नव्हता. आज तो अधिकार नाकारल्या जात आहे. स्त्री भ्रुण दिसताच गर्भातच मारून टाकले जात आहे.

स्त्री आदिवासी असो किंवा प्रगत, मुलगी वयात आली की लवकरच तिच्यावर कौटूंबीक जबाबदारी येऊन पडते त्यामुळे ती सतत विवंचनेत राहते लागोपाठ मुले झाली तर शरिराने आनखीच कमजोर होते. त्यातही मुलगा झाला नाही, तर वारंवार गर्भपात, म्हणजेच भ्रुण हत्या. सर्व समाजात हे चालूच आहे.

**भारतातील लिंग भेदाची कारणेः—**

1. स्त्री म्हणून
2. शारिरीक व मानसीक दृष्ट्या कमजोर
3. रूढी परंपरांचा भार
4. कुटूंब संस्थेत पूरूषांची सत्ता
5. स्त्री ही पायातील जूती (विचार सरणी)
6. चारित्र्यहननाची भिती
7. भारतीय संस्कृती
8. बदल करण्यास सुजाव
9. रांधा, वाढा, उष्टी काढा
10. मुलीला ओझे समजन्याची प्रथा
11. मुलगी जन्माला घालने म्हणजे मागील जन्माचे पाप
12. शिक्षणापासून वंचीत
13. विधवा विवाहाला बंदी घातल्यामुळे स्थिती दयानीय झाली
14. स्त्रीयांची मानसीकता,
15. जाती व्यवस्था
16. हुंडा पध्दती

या कारणांमूळे लिंग भेद होत राहीला व यामूळे आनखीच ही विषमता वाढू लागली.

**भारतातील लिंग विषमता आणि विचारवंताची मतेः—**

**डॉ आंबेडकर** :— डॉ आंबेडकरांच्या सामाजिक विचारानुसार समताधिष्ठीत समाज असावा. जात, धर्म, लिंग इत्यादी आधारावर समाजात भेदभाव नसावा. स्त्रियांना शिक्षण प्राप्त झाल्यास कुटूंबाचा विकास होईल. कुटूंबाचे जिवनमान सुधारण्यासाठी स्त्रि शिक्षण आवश्यक आहे. असे ते म्हणत स्त्रीयांनी कपडा आणि दागिन्या पेक्षा आपल्या कलागुण वाढविण्यावर भर द्यावा असे मत त्यांनी प्रतिपादीत केले. आंबेडकरांच्या विचारामूळेच आज कायद्यासमोर सगळे नागरीक समान मानले जातात.

**आगरकर** :— ''माणसाचे माणुस म्हणून असेलेले अधिकार कोणीही नष्ट करू शकत नाही संपुर्ण देशातील विषमता नष्ट करून समताधिष्ठीत समाज कसा निर्माण करता येईल यांचा त्यांनी बारकाईने विचार केला. आपला पारंपारिक समाजात जास्तीत जास्त स्त्रीयांना शिक्षणापासून वंचीत ठेवण्याचे एकमेव कारण म्हणजे लिंगाधिष्ठीत असमानता होय. ही असमानतेची समस्या सामाजीक संरचनेतून निर्माण झाली असून स्त्रीचे स्थान पुरूषापेक्षा दुय्यम दर्जाचे ठरवून तीला दुर्बल बनविण्यात आले. हिंदू समाज व्यवस्थेत स्त्री यांच्या शोषणाची अनेक उदाहरण सर्वत्र आढळतात.

**माहात्मा गांधी** :— आजच्या समाजात स्त्रियांच्या सबलीकरणाचा विचार महत्वाचा आहे. 1938 साली विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात गांधीजी म्हणतात. स्त्रियांना आपले स्वातंत्र प्राप्त करूण घेण्याची इच्छा असेल तर त्यांचे पहीले साधन शिक्षण आहे. मुलापेक्षा मुलीला शिक्षण देने महत्वाचे आहे भारत स्वतंत्र झाल्यावर मी जिवंत असलो आणि माझा अधिकार चालू राहीला तर मी शिक्षणावर भर देईन. स्त्रियांना दिर्घ काळ संघर्ष करावा लागनार आहे याची कल्पना न केलेलीच बरी त्यासाठी तिने शिकावे ''एक आई अन् शंभर शिक्षकाची भरपाई'' अशी आपल्याकडे म्हणच आहे असे ते म्हणत.

**राम मनोहर लोहीया** :— स्वातंत्र्य मिळून देशाची स्वतःची घटना अस्तित्वात आली तरी आज कुठेही समता समानता दिसत नाही. स्त्रि पूरूष समानतेचा त्यांनी आग्रह धरला स्त्रियांवर होणारे अत्याचार त्यांची उपासमार पाण्यासाठी सोसावे लागणारे कष्ट, संडासाच्या सोईचा अभाव, चुलीच्या धुरामुळे डोळ्यांची खराबी अशा अनेक प्रश्नांची त्यांनी चर्चा केली. संस्कृतीच्या नावाखाली चुकीचा आदेश त्यांना दिला गेला. स्त्रियांनी दबाव आणनाऱ्या तंत्राची साधने शोधू नयेत म्हणून त्यांना नाजूकपणा, सौंदर्य, मार्दवता, नम्रता, सहनशिलता अशा गोष्टींचा उदोउदो करून स्त्रिला मंत्रमुग्ध केले आणि सामान्य स्त्रिया त्यात अडकल्या. त्याचा एक कोषच अवती भवती विनल्या गेला. लोहीयांच्या मते, जातीभेद, लिंगभेद हे लोखंडी पिंजरे आहेत. स्त्रियांचे कनिष्ट स्थान या जातीमुळेच निर्माण झाले.

**समर्थ रामदास स्वामी** :— समर्थ रामदासांना स्त्रियांना कुटूंबात दुय्यम स्थान किंवा अबला म्हणून तिला परावंबी ठेवने मुळीच मान्य नव्हते. स्त्री हे शक्तीचे प्रतीक आहे, तीला ज्ञानग्रहणाचे आणि आचरणाचे स्वातंत्र्य पाहिजे. समाजाच्या बंदिस्त चौकटीतून स्त्रिला बाहेर काढण्याचा

जो प्रयत्न त्या काळात केला गेला तो क्रांती कारक नसला तरी समाज परिवर्तनाला दिशा देणारा ठरला. स्त्रियांवर होत असलेल्या अत्याचाराचे स्वरूप त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास ''किती उत्तम या स्त्रिया भ्रष्टनिती। किती गुजरिणी भ्रष्टीच्या ब्राम्हणी। किती एक देशान्तरी या विकल्या। किती सुंदरा हाल होऊनी मेल्या किती मोर बांधुनी ते बुडविती। पिछाडेची बांधोनी हिरावानी नेती। तत्कालीन समाजात स्त्रियांचे हाल होत होते त्यांचे मार्मीक विवेचन समर्थ रामदासांनी केले.

**स्वामी विवेकानंद** :– स्वामीजी म्हणतात भारतीय तत्वज्ञानात ''स्त्रिचे महत्व असाधारण स्वरूपात मानलेले आहे. प्रकृती आणि पुरूष'' अशी दोन मुलतत्वे मानलेली असून त्या पैकी कोणीही एकाचे महत्व दुसऱ्या पेक्षा कमी मानलेले भारतीय तत्वज्ञान कुठेही आढळत नाही. स्त्रिला पुरूषा इतके महत्व देणारे भारतीय तत्वज्ञान वरवर पाहाता अनेक विंसगतीनी भरलेले आढळून येते. जेथे स्त्रिला विश्व निर्मितीचा आधार मानले आहे. तिथेच तिला अनेक पापाची पोतडी किंवा मोहाची मुळ कारण सुध्दा मानलेले आहे.

**लोकमान्य टिळक** :– बालविवाहास प्रथम विरोध करणारे टिळकच होते. मुलीचा विवाह सोळाव्या वर्षी व मुलांचा विसाव्या वर्षी करावा. चाळीस वर्षावरील पुरूषांनी विधवांशीच विवाह करावा नाहीतर अविवाहीत राहवे. विधवांना विद्रुप करू नये असे मते मांडले.

स्त्रि म्हणूनच तिला अत्यंत वेदना सहन कराव्या लागल्या स्त्रि पूरूष समानता असती तर स्त्रियांना इतक्या यातना सहन कराव्या लागल्या नसत्या. लिंग असमानता ही सुध्दा एक सामाजीक विषमता आहे. लिंग विषमते मुळे अत्याचार, बलात्कार, अहवेलना, अपमान ह्या साऱ्याचे प्रमाण वाढत आहे. लिंग असमानतेमुळे आज स्त्रिच्या गर्भात वाढणारा स्त्रि भ्रुण काढून फेकून दिल्या जात आहे. त्यामुळे स्त्रियांची संख्या कमी होत आहे.

सावित्रीबाई फुल, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, मादाम कामा, कस्तुरबा गांधी, कमलादेवी चट्टोपाध्याय, आंबाबाई वाडीया अशा असंख्य ज्ञात अज्ञात स्त्रियांची आठवण करून तरी हा लिंग भेद मिटवायला पाहिजे. आजही मुलगी झाली की नाराज होतात. मुलगा झाला कि आनंद संपत नाही. हा भेद किती दिवस चालणार. स्त्रि पूरूष हा भेद जो पर्यंत दुर होणार नाही तो पर्यंत या भारताचा विकास होणार नाही.

**स्त्रिच्या घटत्या प्रमाणाचे समाजावरील परिणाम** :– स्त्री पुरूष विसंगतीपूर्वी समाजात होती. आज गर्भजल परिक्षणामुळे गर्भातच विसंगती होत आहे. स्त्री भ्रूण हत्या होत असल्यामुळे गर्भातच तिच्यावर अत्याचार होत आहे. म्हणूनच स्त्रियाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. 2001 ला हे प्रमाण 933 होते. 2011 ला 940 इतके आहे. 2012 ला कसे राहील ? हा प्रश्नच आहे यामुळे कुटूंब व्यवस्था ढासळेला मुलांना लग्नासाठी मुली मिळणार नाही, बहिणीचे महत्व कमी होईल, नविन संस्कृती ऐवजी विकृती जन्मास येईन, अर्थ व्यवस्था कमजोर होईल, सामाजिक सांस्कृतीक समतोल ढासळेल आणि पून्हा समाजात अंधार पसरेल प्रगतीच्या वाटेन जाणाऱ्या या देशाला अंधार युगाकडे वाटचाल करावी लागेल. समाजाचे स्वास्थ बिघडेल, नैतीक मुल्यांचे अधःपतन होईल, लैंगिक दुराचार वाढेल. आरोग्याच्या समस्या वाढतील.

**स्त्रि भ्रुण हत्या थांबविण्यासाठी उपायः–** 1) पूरूषाचा स्त्रिकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलविणे. 2) समाजाने स्त्रिच्या अस्तीत्वाची जाणीव ठेवावी. 3) स्त्रिने स्त्रिच्या अस्तित्वाची काळजी घ्यावी. 4) मानसीकता बदलवावी. 5) सामाजिक, कौटूंबीक विचारात बदल आणने. 6) गर्भजल परिक्षणावर बंदी आणने.

सुशिक्षीत महिलांनी भ्रूण हत्येला विरोध करावा मुलिंना या जगात येऊ द्यावे तेव्हाच एखादी सावित्री होईन एखादी इंदिरा गांधी होईल. म्हणतात ना आई वडिलांना शिवाय त्यांच्या मुलांचा विकास होऊ शकत नाही. आई वडीलांच्या संस्कारात वाढलेल मुल संस्कारी होतात. मग आई वडिलच का असे कृत्य करतात. म्हणूनच गर्भातील स्त्री भ्रुण म्हणते.

प्रवासात माझ्या, काटे का आड आले
आई वडिलच माझे, वैरी कसे झाले
मला न बघताच त्यांनी हे कृत्य का केले
माझे जिवंत स्वप्न, जागीच ठार झाले.

---

**संदर्भ ग्रंथ सुची**

1) भारतातील महिला विकासाची वाटचाल – ज. श. आपटे, पूल्वारोडे
2) विविधांगी आयामातून स्त्रि – डॉ. अल्का देशमुख
3) बुधत्वके अग्रदूत डॉ आंबेडकर – सी. डी. नाईक,
4) मुलभूत हक्क नागरीक स्वातंत्र्य – मधुकर साठे,
5) राजकीय विचारवंत – श.गो. देवगावकर
6) आदिवासी समाजाचे समाज शास्त्र – डॉ. प्रदिप आगलावे
9) देशोन्नती, सकाळ, लोकसत्ता, लोकमत

# ग्रंथालयात आर. एफ. आय. डी. तंत्रज्ञानाचा वापर

**प्रा. सुनिल कान्होलकर**, ग्रंथपाल, एस.एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर

संक्षेप :– ''ग्रंथालयात ग्रंथालय प्रवेश तसेच ग्रंथचोरीच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी RFID (Radio Frequency Identification) हे आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली आहे. Barcode वर पर्यायी म्हणून हया तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. ग्रंथालयात RFID चा वापर कश्यारितीने करतात हे प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.''

**1. प्रस्तावना :–** पाश्चात्य देशातील ग्रंथालयात ग्रंथालय प्रवेश तसेच ग्रंथचोरीच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवू शकणाऱ्या अनेक प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक तसेच मेकॅनिकल पध्दतीच्या साधनांचा उपयोग केला जातो आहे. ही साधने अधिक आधुनिक तसेच विकसनशिल होत आहेत. शिवाय नवीन तंत्रज्ञानावर आधारित नवीन साधनांचा शोध लागतो आहे. ग्रंथालय सुरक्षेसाठी अशी खास साधने आज विविध स्वरूपात उपलब्ध आहेत. ज्यामध्ये पुढील साधनांचा समावेश होतो. 1. इलेक्ट्रोमॅग्नेटिक किंवा चुंबकिय तंत्रज्ञानावर आधारित साधने व 2. RFID तंत्रज्ञानावर आधारित साधने.

**2. RFID चा इतिहास :–** ग्रंथालयात सुव्यवस्थित, कार्यक्षम व गुणात्मक सेवा देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग होतो. RFID (Radio Frequency Identification) हे तंत्रज्ञान तीस वर्षाआधी विकसित झालेले तंत्रज्ञान आहे. सुरवातीला हे तंत्रज्ञान रानटी आणि पाळीव प्राण्यांवर लक्ष ठेवण्यासाठी उपयोगात आणले जात होते. त्यानंतर उद्योगांमध्ये हे तंत्रज्ञान वापरण्यात आले. 2004 ला डेनमार्क मधील ॲम्युसमेंट पार्कमध्ये लहान मुलांच्या सुरक्षेसाठी हया तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. मुलांसाठी RFID Wrist bands तयार केले. जर मुले पार्कमध्ये हरविली तर त्यांना शोधण्यासाठी पार्कसभोवताल RFID reader लावण्यात आले.

आता हे तंत्रज्ञान ग्रंथालय सुरक्षेसाठी ग्रंथालयात उपयोगात आणले जाते. ग्रंथसंग्रह हाताळण्यासाठी व देवघेव प्रक्रिया सोपी व जलद गतीने व्हावी यासाठी RFID चा उपयोग करण्यात येतो. Automatic Identification आणि Data Capture (AIDC) करण्यासाठी RFID हे तंत्रज्ञान ग्रंथालयात वापरले जाते. पारंपारीक बारकोड पध्दतीच्या तुलनेने अधिक सक्षम अशी RFID प्रणाली ही ग्रंथालयात उपयोगात आणली जाते.

**3. ग्रंथालयात RFID तंत्रज्ञानाची गरज/आवश्यकता :–**

1. वाचकांना देण्यात येणाऱ्या सेवा विकसित करण्यासाठी RFID ची अंमलबजावणी ग्रंथालयात करण्यात येते.
2. देवघेव कर्मचाऱ्यांची क्षमता विकसित करण्यासाठी.
3. ग्रंथालयातील साधनसामुग्री (जसे CD's DVD's, Books etc) कमी वेळात व्यवस्थित लावण्यासाठी.
4. ग्रंथसंग्रह अचूक जागी लावण्यासाठी.
5. भविष्यात येणाऱ्या नवनवीन ग्रंथालयीन सेवा, कर्मचारी न वाढविता तितक्याच कर्मचाऱ्यांमध्ये देणे शक्य होते.

**4. आर. एफ. आय. डी. (रेडिओ फ्रिक्केंन्सि आयडेंटिफिकेषन सिस्टिम ) म्हणजे काय? :–** रेडिओ फ्रिक्केंन्सि आयडेंटिफिकेशन सिस्टिम किंवा आर. एफ. आय. डी. (RFID) हे तंत्रज्ञान स्मार्ट आयडेंटिटि कार्डप्रमाणे काम करते. यास पुस्तकाचे आयडेंटिटि कार्ड म्हटले तरी चालेल. 3ड चुंबकीय पध्दतीत 3ड टॅटल टेप/स्ट्रिप असतात, तर इथे (RFID) टॅग असतात. ही एक मेमरी चीप असते. त्यामध्ये पुस्तकाची सूचिबध्द माहिती व त्याची देवघेव स्थिती साठविलेली असते. असा (RFID) टॅग पुस्तकांच्या कव्हरच्या आतील बाजूस विशिष्ट मशिनच्या आधारे तयार करून चिकटवला जातो व तो पुस्तकाबरोबरच राहतो. ग्रंथालयाच्या आज्ञावलीतील पुस्तकाच्या डेटाबेसशी हयाचे नाते असते. (RFID) टॅग असलेले पुस्तक 3ड /(RFID) वर्कस्टेशनवर ठेवल्यास RFID टॅग वाचून पुस्तकाबददल माहिती स्क्रिनवर दाखविली जाते अर्थात तो आज्ञावलीच्या पडदा असतो. असा डेटा डिस्प्ले झाल्यावर आज्ञावलीच्या आधारे देवघेवीसंबंधी व्यवहार केले जातात. पुस्तक ग्रंथालयाबाहेर वाचकास दिले असल्यास आज्ञावलीत तशी माहिती साठवून त्याची नोंद (RFID) टॅगमध्येही केली जाते. असे पुस्तक वाचक ग्रंथालयाबाहेर नेतो तेव्हा ते 3ड /(RFID) डिटेक्शन दरवाज्यातून जाते व गेटशी जोडलेल्या संगणकावर अमूक एक पुस्तक अमूक एक वाचक रीतसर घेऊन जातो ही माहिती दाखविली जाते. असे पुस्तक पुन्हा 3ड /(RFID) Work Station वर ठेऊन आज्ञावलीच्या आधारे ते ग्रंथालयात रीतसर परत करून तशी नोंद आज्ञावलीत व RFID tag मध्ये केली जाते.

RFID पध्दतीने ज्या पुस्तकास टॅग लावला आहे त्याबददलची माहिती डिकोड (decode) करण्याची सोय उपलब्ध असते. अशी सोय 3ड चुंबकीय पध्दतीत उपलब्ध नसते. हाच फायदा RFID तंत्रज्ञान 3ड चुंबकीय तंत्रज्ञानावर मात करतो. दोन्हीही पध्दती सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयोगी आहेत. परंतू RFID पध्दतीमध्ये जास्त

अचूकता आहे. त्यातल्या त्यात ही Intelligent पध्दती म्हणावी लागेल. RFID तंत्रज्ञान स्वीकारण्यामध्ये मोठी अडचण तिच्या प्रचंड किंमतीमुळे येते.

3ड चुंबकीय पध्दतीच्या तुलनेत RFID टॅग बनविण्याचे मशिन व RFID टॅग या अतिरिक्त गोष्टी आहेत व प्रत्येक टॅगची किंमत रूपयाच्या चलनात (सर्व यंत्रसामुग्री आयात करावी लागते.) 30–40 रू. च्या दरम्यान आहे. 3ड टॅटल टेपची किंमती रू. 7 ते 9 दरम्यान आहे. यावरून लक्षात येते की हे RFID तंत्रज्ञान तसे स्वस्त निश्चितच नाही; परंतू RFID तंत्रज्ञान वापरण्यामध्ये फायदे खूपच आहेत. पुस्तकाची देवघेव जलद व अचूक व्हावी यासाठी पुस्तकांना बारकोड (लाईनकोड) चिकटवले जातात. या बारकोडच्या आधारे ग्रंथ दाखलनोंद कमांक, स्कॅनरच्या मदतीने वाचून ते आज्ञावलीत नोंदवले जातात. हे करत असताना प्रत्येक पुस्तकाचा बारकोड स्कॅन करून नोंदवावा लागतो; परंतू RFID पध्दतीत ग्रंथ दाखल नोंद कमांक व पुस्तकाबददलची माहिती टॅग किंवा चिपमध्ये साठविलेली असते.

RFID तंत्रज्ञान वापरात ग्रंथालय देवघेव आज्ञावली व RFID तंत्रज्ञान आज्ञावली यांचा सुसंवाद होणे आवश्यक असते. त्यासाठी ग्रंथालय आज्ञावली RFID तंत्रज्ञानाशी मिळतीजुळती असणे गरजेचे असते. तशी सोय नवीन आज्ञावलीत घेतानाच करून घेणे गरजेचे आहे. मॅग्नेटिक आणि RFID या दोन्ही तंत्रज्ञानामध्ये सुरक्षितता हा समान हेतू असला तरी RFID तंत्रज्ञानाची प्रणाली थोडी वेगळी आहे. प्रथमतः 3ड किंवा तत्सम कंपनीकडून रिकामे टॅग विकत मिळतात. टॅग निर्मिती यंत्र व आज्ञावलीतील ग्रंथाचा सुचीबध्द डेटा यांच्या परस्पर संपर्कातून प्रत्येक ग्रंथास योग्य टॅग तयार केला जातो व तो पुस्तकात कव्हरच्या आत बसविला जातो. पुस्तक इश्यू करताना आधी तयार केलेल्या टॅगमधील माहितीत देवघेवी संबंधी डेटा समाविष्ट केला जातो. अशी पुस्तके ग्रंथालयाच्या बाहेर नेल्यास असे पुस्तक परस्पर (चोरून) ही माहिती लक्षात येता बझर वाजत नाही. परंतू जर टॅग बसविलेले पुस्तक गेटमधून बाहेर नेताना डिटेक्शन गेट व ॲंटेनामुळे डिटेक्ट होऊन बझर वाजतो व अशी ग्रंथचोरी पकडता येते.

RFID तंत्रज्ञानाच्या सुरक्षिततेच्या क्षमतेखेरीज रिडरवर ठेवलेल्या पुस्तकांचा डेटा जलद गतीने वाचणे हे मुख्य वैशिष्टय आहे. त्यामुळे एकावर एक दहा पुस्तके जरी 3ड /RFID रिडरवर ठेवली तरी त्या सर्व दहा पुस्तकांचे टॅग वाचून माहिती संगणकात आज्ञावलीच्या पडद्यावर दाखविली जाऊ शकते. नेमक्या याच वैशिष्टयांचा हे तंत्रज्ञान वापरण्यात फायदा होऊ शकतो.

**5. RFID प्रणालीमध्ये खालील यंत्रसामुग्री येते.**

1. 3ड RFID Conversion Station/ Server
2. 3ड Staff Work Station / RFID Reader
3. 3ड Detection System and Antenna
4. 3ड RFID Tag
5. 3ड RFID Tag Generating Unit
6. RFID Label Printer
7. Handheld Reader
8. Self Check Unit

**6. RFID चा वापर** (Application of RFID)

6.1 **सामान्य वापर** (General Application )

1. Passports
2. Transportation Payments
3. Product Tracking
4. Automotive
5. Animal Identification
6. RFID in inventory systems
7. Human Implants
8. RFID in Libraries

6.2 **ग्रंथालयात वापर** ( Application in Libraries)

1. एकाचवेळी अनेक पुस्तकांची एकत्रितपणे देवघेव शक्य होते.
2. ग्रंथमोजणी केवळ स्कॅनरच्या आधारे फारच कमी वेळात करणे शक्य होते. त्यासाठी पुस्तकांची हालचाल अपेक्षित नाही. केवळ शेल्फवर स्कॅनर फिरवल्याने ग्रंथमोजणीचे काम होते.
3. चुकीच्या ठिकाणी बसलेले पुस्तक Navigator च्या साहाय्याने शोधणे शक्य होते. पुस्तकांच्या टॅगशी सुसंगत वेव्हलेग्न्थ सिग्नल पुरवल्यास नेव्हिगेटरने पुस्तके शोधताना पुस्तक शेल्फवर असल्यास नेव्हिगेटर आवाज करू लागतो व हरवलेले पुस्तक शोधणे त्यामुळे सहज शक्य होते.
4. पुस्तके ग्रंथालयाबाहेर जाताना कुठली पुस्तक कोणता वाचक नेतो आहे याचा तपास करणे शक्य होते. यासंबंधित माहिती साठवून ती संकलित करणे शक्य होते.
5. देवघेव विभागातील कर्मचाऱ्यांना RFID तंत्रज्ञान हे अधिक फायदेशीर व अचूक काम करण्यास उपयुक्त होऊ शकते.
6. ग्रंथालय (सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय आणि संग्रहालय) व्यवस्थापन जलद गतीने होण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त आहे.

**7. बारकोडच्या तुलनेत RFID प्रणाली जास्त फायदेशीर कशी.**

1. RFID तंत्रज्ञान Barcode हे तंत्रज्ञानापेक्षा अधिक फायदेशीर असे तंत्रज्ञान आहे. RFID Tags पुस्तकांना लावल्यास ते जास्त सुरक्षित असतात.
2. RFID तंत्रज्ञानामुळे Self Check Out o Check In ही प्रक्रीया करता येतात. जे Barcode पद्धतीत करता येणे शक्य नाही.
3. पुस्तकांची देवघेव जलद व अचुक व्हावी यासाठी पुस्तकांना Barcode चिकटवले जातात. या बारकोडच्या आधारे ग्रंथ दाखलनोंद क्रंमाक, स्कॅनरच्या मदतीने वाचून ते आज्ञावलीत नोंदवीले जातात. हे करत असतांना प्रत्येक पुस्तकांचा बारकोड स्कॅन करून नोंदवावा लागतो. परंतु RFID पद्धतीत एकावर एक दहा पुस्तके जरी ३ड /RFID रिडरवर ठेवली तरी त्या सर्व दहा पुस्तकांचे टॅग वाचून माहिती संगणकात आज्ञावलीच्या पडद्यावर दाखविली जाऊ शकते.
4. RFID मुळे ग्रंथचोरी लक्षात येते, जी बारकोड प्रणालीत शक्य होत नाही.
5. RFID Tags बारकोडच्या तुलनेत जास्त गतीने वाचला जातो.
6. RFID Tags वर ग्रंथाची जास्तीत जास्त माहिती लिहीली जाते, तर बारकोडवर मर्यादीतच माहिती लिहीता येते.
7. शेल्फ (Shelf) पडताळणी रोज करणे सोपे जाते.

**8. निष्कर्ष :–** RFID ही पुस्तकाचे ओळखपत्र समजले जाते. यात पुस्तकाची सुचिबध्द माहिती व देवघेव स्थिती साठविलेली असते. हया प्रणालीचा ग्रंथालयात वापर करणे अधिक फायदेशीर आहे. विशेष करून ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त फायदेशीर ठरते. Barcode च्या तुलनेत RFID चे अधिक फायदे आहे. RFID प्रणाली ही ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाला सुरक्षित ठेवण्यासाठी उपयुक्त अशी प्रणाली आहे. या प्रणालीमुळे ग्रंथालयातील ग्रंथचोरीला आळा बसतो. RFID तंत्रज्ञान तसे स्वस्त निश्चित नाही. परंतु RFID तंत्रज्ञान वापरण्यामध्ये फायदे खूपच आहेत.

**संदर्भ**


1. http://www.rfid-library.com/images/rfid_e01.jpg (Accessed 10/06/2014)
2. http://www.technovelgy.com/ct/Technology-Article.asp?ArtNum=60 (Accessed 12/06/2014)
3. http://library.igcar.gov.in/readit-2005/conpro/lgw/s5-8,pdf(Accessed 10/06/2014)
4. फडके, द.ना. (2008), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण; तिसरी आवृत्तीः पुणे, युनिव्हर्सल प्रकाषन पृ. 374–376
5. http://3.bp.blogspot.com/
6. Jadhao, Vijay, “RFID Application in Library”: Conference of VLA & State Level Seminar on Librarian & ICT, 16-17 February 2008 (Shegaon: Shri. Sant Gajanan Maharaj College of Engineering, 2008) p.42-43
7. Kamble, Ajay, “RFID Technology in Indian College Libraries: A Bird’s Eye View” ”: Conference of VLA & State Level Seminar on Librarian & ICT, 16-17 February 2008 (Shegaon: Shri. Sant Gajanan Maharaj College of Engineering, 2008) p.46

# 'कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा कुटुंब संस्थेवरील प्रभाव

**प्रा. डॉ. दिपक कृष्णराव पवार,** समाजशास्त्र विभागप्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स, नंदनवन, नागपूर

**प्रस्तावना :—** प्रत्येक समाजात कुटुंब संस्था ही आढळून येते. मानव समाजाची कुटुंब संस्थेशिवाय कल्पनाच करता येत नाही. मानवी समाजातील मूलभूत सामाजिक संघटन म्हणून कुटुंबाचा उल्लेख करण्यात येतो. सर्वच सामाजिक समुहात कुटुंब एक मूलभूत आणि प्राथमिक स्वरूपाचा सामाजिक समूह आहे. म्हणूनच चार्लस कुले यांनी कुटुंबाला 'प्राथमिक समूह' म्हटले आहे. इतर कोणत्याही समूहापेक्षा कुटुंब सर्वव्यापक स्वरूपाचे असून मानवी विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये कुटुंबाचे अस्तित्व दिसून येते. म्हणूनच मानवी समाजाचा इतिहास म्हणजे कुटुंबाचा इतिहास होय असे म्हटले जाते. हया कुटुंबाचा कणा स्त्री आणि पुरूष आहेत.

प्रांरभीच्या काळात भारतीय कुटुंबसंस्थेत स्त्री आणि पुरूषांना समान अधिकार आणि मानसन्मान होता. वैदिक काळात स्त्रीयांची स्थिती चांगली होती पण उत्तर वैदिक काळात रूढींनी आपले स्थान निर्माण केले. ज्याचे परिणाम कुटुंबसंस्थेतील स्त्रियांचे अधिकार आणि मानसन्मान कमी होत गेले. पुरूष प्रधान संस्था स्त्रीयांच्या अधिकारांना हिरावत गेली. त्यांचे शोषण करत गेली. त्याचेच परिणाम स्त्रियांची स्थिती खालावत गेली. रूढी आणि परंपरांना धर्ममार्तंड लोकांची सोबत मिळाल्याने हळू हळू स्त्री परतंत्र, असहाय्य आणि निर्बळ होत गेली तसेच पुरूष प्रधान कुटुंब संस्थेने स्त्रीजातीचे कौटुंबिक अधिकार सुध्दा हिरावून घेतले. मध्ययुगीन काळात भारतीय स्त्रियांची स्थिती अधिकच दयनीय बनली, परंतू वेळेनुसार समाजात सुधारणा होत गेली आणि समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी भरघोस प्रयत्न केले गेले. ज्यामूळे त्यांच्या स्थितीत बरेच परिवर्तन झाले आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांची स्थिती :—** 15 ऑगस्ट 1947 ला भारत देश स्वतंत्र तर झाला, पण भारतातील कुटुंबसंस्थेतील स्त्री—पुरूषांची दरी मात्र कायम होती. कुटुंबसंस्थेमध्ये स्त्रियांना निम्न दर्जाचा दिला जात होता. स्त्रियांवरील अनेक सामाजिक, धार्मिक, आर्थिक बंधनाची पकड कमी होत नव्हती. या सर्वांचा विचार करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करतांना स्त्री समतेला प्राधान्य दिले.

भारतीय राज्य संघटनेच्या कलम 14 नुसार सर्वांना समान अधिकार दिला आहे. तर कलम 15 नूसार लिंगभेदाच्या आधारावर कोणत्याही नागरिकांविरूद्ध राज्य भेदभाव करणार नाही. याची हमी दिली आहे. याचा अर्थ स्त्री—पुरूष समाज आहेत. त्यामूळे दोघांनाही समान अधिकार आहेत.

कलम 16 नुसार लिंगभेदाच्या आधारावर सेवायोजना किंवा पद याकरिता अपात्र ठरविण्यात येऊ शकत नाही. याचा अर्थ सेवायोजनात स्त्रियांच्या नोकरीच्या संदर्भात संधी मिळून त्या आर्थिक दृष्टया स्वावलंबी होण्यास मदत झाली. हया कलमांमुळे कुटुंबसंस्थेत स्त्रियांना मान—सन्मान मिळविण्याची संधी प्राप्त झाली.कलम 19 नुसार स्वातंत्र्याचा हक्क मिळाला आहे. यात भाषण देणे, संघ बनविणे, एकत्र जमा होणे, भारतात मुक्तपणे संचार करणे तसेच प्रत्येकाला कायद्याच्या चौकटीत असणारा कोणताही व्यापार, व्यवसाय, करण्याचा अधिकार दिला आहे. त्यामूळे शेकडो वर्षे कुटुंबसंस्थेतील गुलामीचे जीवन जगणाऱ्या स्त्रियांस स्वातंत्र्य प्राप्त झाले.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 39(क) नुसार उपजीविकेचे पुरेसे साधन मिळविण्याचा स्त्री व पुरूष यांना समान हक्क दिला आहे.

कलम 39(घ) नुसार पुरूष व स्त्रिया या दोघांनाही समान वेतन मिळण्याच्या संदर्भात तरतुद झाली व त्यातून स्त्रियांचे जीवनमान वाढून कुटुंबसंस्थेतील त्यांची जागा उंचावण्यास मदत झाली. अषा विविध कायद्यांमूळे कुटुंबसंस्थेतील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी बराच फायदा झाला.

प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रिया कुटुबसंस्थेतील सामाजिक आणि धार्मिक बंधनात गुरफटलेल्या होत्या. ही सत्यस्थिती लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या हक्का संदर्भात हिंदू कोड बिल संसदेत 12 ऑगस्त 1946 रोजी सादर केले. पंरतू देषातील धर्ममार्तडांनी प्रखर विरोध केला. त्याचाच निषेध म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सप्टेंबर 1951 मध्ये कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. हिंदू कोडबिल हे स्त्रियांच्या संदर्भात महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन नंतर हे बिल तुकडया तुकडयात पारित करण्यात आले.

1. हिंदू विवाह कायदा, 1955, 2. हिंदू वारसा कायदा, 1956. 3. हिंदू अज्ञान पालकत्वाचा कायदा, 19556. 4. विशेष विवाह कायदा, 1956, 5. हिंदू दत्तक आणि पालणपोषण कायदा, 1956. या पाच कायद्या व्यतिरिक्त कुटुंब संस्थेतील स्त्रियांच्या दृष्टीने व त्यांना स्वतंत्र होण्याच्या दृष्टीने काही कायदे खालीलप्रमाणे—

1. किमान वेतन अधिनियम 1948

2. कारखाना अधिनियम, 1948
3. किमान वेतन अधिनियम, 1950
4. खाण अधिनियम, 1952
5. सिनेमॅटोग्राफ अधिनियम, 1952
6. पारसी विवाह अधिनियम, 1955
7. अनैतिक वाहतुक अधिनियम, 1956
8. हिन्दु अल्पवयीन तसेच साक्षरता अधिनियम, 1956
9. वृक्षारोपण श्रमिक अधिनियम, 1957 महिलांशी संबधित विशेष प्रावधान.
10. मुले अधिनियम, 1960
11. हिंदू विवाह अधिनियम, 1960.
12. मातृत्व लाभ अधिनियम, 1961.
13. हुंडा प्रतिबंध कायदा, संशोधित अधिनियम 1986.
14. बिडी व सिगार कामगार अधिनियम, 1966.
15. विदेशी विवाह कायदा, 1969.
16. कंत्राटी कामगार अधिनियम, 1960.
17. वैद्यकिय गर्भधारणा समाप्ती कायदा 1971.
18. समान वेतन अधिनियम, 1976
19. शुल्कबंध कामगार प्रणाली अधिनियम, 1979
20. कौटुंबिक न्यायालय अधिनियम, 1984
21. मानवाधिकार घोषणा, 10 डिसेंबर 1984.
22. मुस्लीम महिला अधिनियम, 1986
23. बालमजुरी (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, 1986
24. सतीप्रथा निवारक अधिनियम, 1987
25. मानसिक आरोग्य कायदा, 1987
26. महिला राष्ट्रीय आयोग कायदा, 1990
27. मानवाधिकार सुरक्षा कायदा, 1993
28. जन्मपूर्व निदान तंत्र अधिनियम, 1994
29. बाल न्याय अधिनियम, 2000.

या सर्व कायद्यामूळे स्त्रीला समाजात सन्मानाने जगण्याची संधी मिळाली, आर्थिक सुरक्षितता मिळाली. या सर्व कायद्यामूळे स्त्रीला कुटुंब संस्थेतील आपला गमावलेला मानसन्मान मिळवण्याची संधी मिळाली. परंतू दुर्देवानी शिक्षणाचा अभाव असल्यामूळे आजही विकसनशिल समजल्या जाणाऱ्या भारतात स्त्रियांना आपले अधिकार पूर्णपणे माहिती नाहीत. हेच कारण आहे की, आजही समाजात आणि कुटुंबसंस्थेत स्त्रियांचे शोषण केले जाते. याचा अर्थ हा नाही की आपल्या देशात कायद्याची कमतरता आहे, किंवा स्त्री जवळ उपायांची कमी आहे. खरे कारण तर हे आहे की, देशात कायदे पुष्कळ आहेत पण त्यांची माहिती समाजातील सर्वसाधारण स्त्रियांकडे नाही. कायद्याचा हा पहिला सिद्धांत आहे की, “Ignorance of Law in no excuse”.

आतापर्यतच्या लिखित इतिहासात असे नमुद आहे की, समाजसुधारणा चळवळीमूळे स्त्रियांच्या शिक्षणाला सुरूवात झाली, कायद्याच्या पाठबळामूळे जाचक, वाईट प्रथा बंद झाल्या आणि स्त्रियां आपल्या पायावर उभ्या राहायला समर्थ झाल्या. पण स्त्रियांना उभे राहण्यासाठी पायाला जे बळ लागतो ते म्हणजे स्त्रियांचा स्वतःचा आत्मविश्वास आणि कुटुंबाचा आधार. पण शोकांतिका ही आहे की प्रत्येकच कुटुंब स्त्रीसाठी आधार बनत नाही. कुटुंबात राष्ट्रीय चरित्र्याची निर्मित होते. राष्ट्रजीवनाची पहिली पायरी म्हणजे कुटुंब, समाज, राष्ट्र हे परस्परावलंबी घटक आहेत. कुटुंब सुसंस्कारित असेल तर समाज सुसंस्करित होतो आणि पर्यायाने राष्ट्र. कुटुंबाचा आधार असलेली स्त्री ही हिंसामूक्त असली पाहिजे कुटुंबातल्या स्त्रिांचा हिंसामूक्त आणि सन्मानजनक वातावरणातील वावर कुटुंबाचे आरोग्य सुदृढ करते. पण वास्तविकता मात्र वेगळीच आहे. अनेक स्त्रियांचा मानसन्मान चार भिंतींच्या आत दडपला जातो. कुटुंब संस्थेतील झालेल्या अत्याचाराच्या विरोधात स्त्रियांना कायद्याचे सरंक्षण घेता येत नाही. कारण या कायद्याच्या फायद्यापेक्षा मर्यादाच अधिक आहेत. विवाहीत स्त्रियांची स्थिती आणखी दयनिय होती. छळाची स्पष्ट व्याख्या दिलेली नव्हती. पोलीसांची भूमिका ही नेहमिच संधिग्ध होती, आरोपीसाठी पळवाटा भरपूर असल्यामूळे स्त्रियांना न्याय मिळत नव्हता, कायद्याच्या सखोल माहितीच्या अभावी व भितीमुळे स्त्रिया पोलीस स्टेशन पर्यंत जाण्यास तयार होत नव्हत्या घर तुटायची शक्यताच अधिक असायची. मुलांचा विचार केला विचार केला जाऊन स्त्रिया अन्याय अत्याचार सहन करित राहत. न्यायालयात दाद मागितली तर वर्षानुवर्षे केसेस चालात राहायच्या. अशा अनेक कारणांमूळे कुटुंबसंस्थेतील स्त्रियांच्या सरंक्षणाचा व न्यायाचा प्रश्न कायम असायचा. त्यामूळे नविन कायद्याची आवश्यकता भासू लागली.

कौटुंबिक हिंसाचार हा व्यक्ती अधिकाराचा ज्वलंत प्रश्न आहे, आणि महिला व समस्त समाजाच्या विकासाच्या दृष्टीने मोठी आडकाठी आहे. 1994 मध्ये भरलेल्या व्हिएन्ना परिषदेतल्या बिजिंग जाहिरनाम्यात आणि कृती मंच (बिंजिंग डिक्लरेशन ॲण्ड द प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन 1995) यांनी सुद्धा या गोष्टीचा परामर्श घेतला आहे. युनायटेड नेशन्सच्या महिला वर्गाच्या बाबतचा भेदभाव काढून टाकण्यासाठी भरलेल्या परिषदेच्या समितीने 1989 मध्ये साधारण शिफारस क्र. 12 अन्वये देशातील पक्षांनी महिलांच्या दृष्टीने कौटुंबिक हिंसाचारा पासून रक्षण करण्यासाठी पावले उचलावयास पाहिजेत अशी शिफारस केली होती.

भारतात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना सर्वत्र आढळताना दिसतात. परंतु त्या जनतेच्या डोळयासमोर येत नाहीत. महिला त्यांच्या पतीच्या किंवा त्यांच्या नातेवाईकांचा अत्याचाराला बळी पडायच्या, परंतु भारतात कौटुंबिक हिंसाचारा दखल घेऊन पिढीत महिलंना न्याय देऊन संरक्षण करनारा कायदा नव्हता. भारतीय दंड संहितेच्या कलम 498—अ हे स्त्रियांच्या छळा किंवा अत्याचारासबंधात आहे. पण यात विवाहानंतर हूंडा किंवा तस्सम कारणने छळल्यास या कलमाचा आधार घेता येतो. पण इतर कारणांनी त्रास दिल्यास किंवा छळल्यास किंवा कुटूंबाअंर्तगत हिंसाचाराबाबत मा्त्र सरंक्षण देणारा कोणताही कायदा नव्हता.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 14, 15 आणि 21 अन्वये दिवाणी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राखाली न्याय मिळावा व कुटुंबसंस्थेतील स्त्रियांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये हा दृष्टीकोण डोळयासमोर ठेवून केंद्र शासनाने याबाबत अधिनियम करण्याचा निर्णय घेतला. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे रक्षण करणारा कायदा 2005 (2005 चा 43 वा) कलम 37 खालील प्रदान केलेल्या अधिकारानुसार केंद्र सरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम 2006 तयार केला. व 26 ऑक्टोम्बर 2006 पासुन संर्पून भारतभर हा कायदा लागू करण्यात आला आहे. हा कायदा लागू झाल्यानंतर या कायद्याचा संर्पून कुटूंबावर, स्त्री—पुरूष सबंधावर, महिलांच्या कुटूंबार्तंगत स्थान, दर्जा व भूमिका याबाबत आणि समाजावर दुरागामी परिणाम पडला का? या सर्व बाबींचा विचार करता ''कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा कुटुंबसंस्थेवर पडलेल्या प्रभावाचे समाजशास्त्रीय अध्ययन'' या संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे. हे अध्ययन करीत असल्यामूळे कुटुंब म्हणजे काय? कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय ? या संकल्पनांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

**संकल्पना :— अ) कुटुंब :—** व्यक्ति व समाज यांच्यात आंतरक्रिया घडवून आणणारी व व्यक्तीच्या समाजीकरणाला प्रारंभ करणारी पहिली व महत्वाची संस्था म्हणजे कुटूंब. मूल कुटुंबातच जन्माला येते, कुटुंबातच त्याचे संगोपन होते व्यक्तीच्या अनौपचारिक शिक्षणाचे पहिले केंद्र म्हणजे कुटुंबच होय. म्हणूनच कुटुंबाला 'प्राथमिक सामाजिक संस्था' म्हणतात.

**ऑगबर्न आणि निमकॉफ** — 'अपत्य असलेली किंवा अपत्य नसलेले (अपत्यहीन) पती—पत्नी, अपत्य आणि फक्त वडील (पुरूष) किंवा अपत्य आणि फक्त आई (स्त्री) यांचा स्थायी मंडळास कुटुंब म्हणतात'. **मॅकआयव्हर आणि पेज** — 'प्रजोत्पादन आणि संततीचे संगोपन यासाठी निश्चित आणि दीर्घकालीन लैंगिक संबंधावर आधारलेला एक समूह म्हणजे कुटुंब होय'.

**ब) कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ :—** या अधिनियमाच्या पुर्ततेसाठी प्रतिवादीने अवलंबलेली खालील निर्देशित कोणतीही कृती किंवा वर्तनास कौटुंबिक हिंसाचार असे संबोधण्यात आले आहे. (अ) पीडित व्यक्तीस शारीरिक अवयवास, कल्याणास, जीवितास हानी पोहचत असेल किंवा मानसिक, शारिरीक इजा होत असेल आणि शारिरीक, लैंगिक, मौखिक, भावनिक, आर्थिक छळ होत असेल. (ब) त्रास, हानी, इजा किंवा पीडित व्यक्तीच्या जीवितास धोका पोहचत असेल किंवा पीडित व्यक्ती (महिलेवर) किंवा तिच्या नात्यातील व्यक्तीस दबाव निर्माण करून काही बेकायदेशीर कृत्याची मागणी करण्यात आली असेल किंवा हुंडयाची मागणी करण्यात आली असेल, **किंवा** (क) पीडीत महिलेस किंवा तिच्या नातलगांना धमकाविण्याची कृती वर कलम (अ) व (ब) मध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही कृत्याद्वारे धमकी देणारी व प्रभाव पाडणारी असेल, किंवा (ड) पीडीत महिलेस शारिरीक किंवा माणसिक हानी पोहचविणारी असेल.

**स्पष्टीकरण** :—हया कलमाच्या पूर्ततेसाठी —

1.'**षारिरीक छळ**' म्हणजे अशी कृती किंवा वर्तन जी शारिरीक इजा पोहचविण्याच्या किंवा जिवितास धोका निर्माण करण्याच्या अथवा पिडीत महिलेच्या अवयवास, किंवा प्रकृतीस बाधा आणण्याच्या स्वरूपातील असेल किंवा हल्ल्याच्या, गुन्हेगारी स्वरूपातील धक्काबुक्की किंवा गुन्हेगारी दबाव आणण्याच्या स्वरूपातील कृती ही छळ समजली जाईल.

2.'**लैंगिक छळ**' म्हणजे कोणते ही लैंगिक कृत्य ज्यामूळे महिलेचा अपमान मानहानी किंवा स्त्रीच्या प्रतिष्ठेवर अतिक्रमण करणारे कृत्य.

3.**मौखिक (तोंडी) किंवा भावनात्मक छळ यात**'—

अ) अपमान, कमी लेखण्याची कृती, टाकुन बोलणे, शिव्याशाप देणे, अथवा पोर होत नाही म्हणून उपहास करणे किंवा मुलगा होत नाही म्हणून अपमानित करणे, किंवा ब) अशा कोणत्याही व्यक्तीस शारिरीक इजा पोहचवण्याची वारंवार देण्यात येणारी धमकी की त्या धमकीमध्ये पीडित व्यक्तीचे हित गुंतले आहे.

4.'**आर्थिक छळ' यात** — अ) आर्थिक उत्पन्नापासून (लाभापासून महिलेस वंचित ठेवणे ज्यावर पीडित महिलेचा हक्क आहे किंवा प्रथेप्रमाणे मिळण्यास पात्र आहेत किंवा न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे मिळण्यास पात्र आहेत किंवा पीडित महिलेस गरज आहे. स्त्रीधन मालमत्ता, जी संयुक्त मालकीची आहे किंवा घरगुती वस्तु, जी पीडित

महिलेने वेगळयारित्या मालकी ठेवली आहे, अविभाजित घरोब्याची भाडयाची देणी आणि दुरूस्ती). ब) कोणत्याही मालमत्ता किंवा वस्तुच्या विक्रिचा व्यवहार किंवा वेगळे पाडणारे कृत्य अथवा शेअर (भाग), बॉंड ज्यात पीडित महिलेचा हिस्सा. अशा स्वरूपातील मालमत्ता किंवा घरगुती संबंधानी लाभास पात्र असलेली वस्तु, पत्नीचे स्त्रीधन हया बाबी समाविष्ट आहेत. क) कोणत्याही उत्पन्नापासून वंचित ठेवणे किंवा त्यावर बंदी आणणे किंवा सुविधा मिळू न देणे किंवा सोबतच्या कारणास्तव पात्र असलेल्या लाभापासून दूर ठेवणे.

**स्पष्टीकरणः—** हया अधिनियमाच्या पूर्ततेसाठी कोणतीही कृती, जी गाळण्याची किंवा जोडण्याच्या स्वरूपातील प्रतिवादीची कृती त्यास **'कौटुंबिक हिंसाचार'** असे म्हणता येईल. हया कलमाखाली, प्रकरणातील संपूर्ण तथ्ये आणि परिस्थिती याचा विचार करण्यात येईल.

क) **कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 व नियम 2006 च्या कायद्याचा उपयोग—** जम्मू—काश्मिर सोडून संपूर्ण भारतात हा कायदा लागू होतो. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन अशा सर्व महिलांना हा कायदा लागू होतो. आई, मुली, बहिणी, पत्नी, विधवा, सून, लग्नासारख्या नातेसंबंधात असलेल्या स्त्रिया, वृध्द मातापिता, दत्तक मुल असे सर्वजन या कायद्याचा उपयोग करू शकतात.

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी समग्र किंवा विश्व म्हणून नागपूर जिल्हयाची निवड केली होती. इ.स. 2011 च्या जणगणनेनुसार महाराष्ट्राची एकुण लोकसंख्या 11 कोटी 23 लाख 74 हजार 33 इतकी असून नागपूर जिल्हयाची एकुण लोकसंख्या 46,53,570 एवढी आहे. त्यात पुरूषांची संख्या 23,83,975 आणि स्त्रियांची संख्या 22,68,595 एवढी आहे. नागपूर जिल्हयातील शहरी भागाची लोकसंख्या 31,78,759 असून पुरूषांची लोकसंख्या 16,26,618 आणि स्त्रियांची लोकसंख्या 15,52,141 एवढी आहे. नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागाची लोकसंख्या 14,74,811 एवढी असून पुरूषांची लोकसंख्या 7,58,357 आणि स्त्रियांची लोकसंख्या 7,16,454 एवढी आहे. नागपूर जिल्हयामध्ये नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, उमरेड, भिवापूर, कामठी, काटोल, कळमेश्वर, कुही, नरखेड, रामटेक, सावनेर, हिंगणा, मौदा, पारशिवनी, अशा चौदा तालुक्याचा आणि उमरेड, कामठी, काटोल, कळमेश्वर, नरखेड, रामटेक, सावनेर, मौदा, पारशिवनी, खापा, महादूला, मोवाड, वाडी या नगर परिषदांचा समावेश आहे.

**'कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा कुटुंब संस्थेवर पडलेला प्रभाव'** :— 1. कौटुंबिक हिंसाचार कायद्याच्या अमंलबजावणीमुळे, सवांद माध्यमातून केल्या गेलेल्या प्रसार व प्रचार आणि संर्पूण जनमानसात निर्माण केलेली जागृकता, यामुळे पुरूषी वर्चस्व प्रवृतीला नियंत्रण आले आहे. कायद्याच्या धाकामुळे कुटूंबाअर्तगत स्त्रियांवर होणारा मानसिक, शारिरीक अन्याय, अत्याचाराचे प्रमाण खुप कमी होऊन कुटूंबाअर्तगत व पर्यायाने समाजातील स्त्रियांची स्थिती व दर्जामध्ये वाढ झालेली आहे.

2. भारतिय समाजात पुरुषप्रधान समाजव्यवस्था आहे. संपूर्ण कुटूंबावर पुरूषांचीच सत्ता व वर्चस्व होते. 'कुटूंबातील स्त्री छोटी असो वा वृध्द ती पुरूषांच्याच वर्चस्वाखाली राहायची. कुटुंबाअंतर्गत पुरूषी अन्याय अत्याचार मुकाटयाने सहन करीत जीवन व्यतीत करायची पण कौटुंबिक हिंसाचारावर कायद्याच्या प्रभावाने पुर्वीपेक्षा पुरूषांचे वर्चस्व कमी झालेले आहे. कौटुंबिक हिंसाचारावर कायद्याचा स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार व दडपशाहीचे प्रमाण कमी झाले आहे.

3. या कायद्यामूळे कुटुंबाअंतर्गत संघर्ष निर्माण झालेला आहे. कारण शतकानुशतके पुरूषांचा अन्याय, अत्याचार व दडपशाहीच सहण करणारी स्त्री कौटुंबिक हिंसाचारावर कायद्याचा आधार घेऊन पुरूषांचे वर्चस्व नाकारत आहे. अनेक स्त्रियांनी कौटुंबिक हिंसाचारा विरूद्व, पोलिस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल केल्या आहेत. तर अनेक स्त्रिया या कायद्याचा आधार घेउन पुरूषांवर दबाव आणून त्यांना झूकवत आहेत. कुटुंबाअंतर्गत संघर्ष निर्माण झालेला आहे. त्यामुळे कौटुंबिक संघर्ष निर्माण होऊन समाजात काही प्रमाणात कुटुंब विघटनाचे प्रमाण वाढलेले आहे.

4. कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा, कुटुंबातील स्त्री—पुरूष संबंधावर प्रभाव पडला असून, स्त्री—पुरूष सबंध पुरूष उच्च व स्त्री गुलाम असे राहीले नसुन यात बरेच परिवर्तन झाले आहे. व त्याचा प्रभाव समाजामधील स्त्री—पुरूष संबंधावर पडला आहे. या कायद्याच्या प्रभावाने समाजात स्त्री—पुरूष समता निर्माण होण्यास मदत होत आहे.

5. कायद्याच्या प्रभावातून समाजात कौटुंबिक हिंसाचारावर प्रतिबंध येऊन पुर्वीपेक्षा पुरूषांचे वर्चस्व कमी झालेले आहे. कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार व दडपशाहीचे प्रमाण कमी झाले आहे. या कायद्याच्या प्रभावाने समाजात स्त्री—पुरूष समता निर्माण होण्यास मदत झाली आहे. कौटुंबिक हिंसाचारावर कायदा कुटूंबाअर्तगत व समाजात परिवर्तन निर्माण करण्यास सहाय्यक ठरला आहे.

# आधुनिक काळात पालक–बालक संबधाचे स्वरूप

**प्रा. सुनिता अ. राठोड**, गृहअर्थशास्त्र विभाग, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा.

आधुनिक शहरी कुटुंबात आई–वडील आणि मुले यांच्यामध्ये आज मोकळे आणि मित्रत्वाचे संबंध असलेले दिसतात. मुलांना स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. मूल म्हणजे प्रौढाची छोटी आकृती नाही तर त्याच्या आशा–आकांशा, विचार भावना या प्रौढ व्यक्तीपेक्षा वेगळया असतात. हे लक्षात घेऊन आजचे सुजान पालकवर्ग आपल्या पाल्यांशी जिव्हाळयाचे, मित्रत्वाचे संबंध ठेवत असल्याचे दिसते. आज मुलाच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी पद्धतशीर प्रयत्न होत असलेले दिसतात. आधुनिक कुटुंबात मुलाला सर्व सुखसोयी आणि भरपूर स्वातंत्र्य उपभोगावयास मिळाल्यामुळे त्यांच्या वैशिष्टयपूर्ण विकासाला संधी मिळते. पूर्वीच्या एकत्र कुटुंबात घरातील वडील माणसाचा जबरदस्त धाक असते. कडक शिस्त. दडपशाहीचे वातावरण आणि सर्वत्र घालण्यात आलेली बंधने यातून मुले मोठी होत असतात. या परिस्थितीत मुलांच्या आवडीनिवडीलाही काहीही वाव नसते. मुलांचे छंद जोपासले जात नसते त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्वाची कुचंबना होत होती. त्या पार्श्वभूमीवर आजच्या पालकवर्गाचा विचार करता बालमानसशास्त्राचे ज्ञान असलेला पालकवर्ग मुलांच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष देत असलेला आढळतो. आजच्या कुटुंबातून मुलाच्या छंदाची जोपासना केली जाते. सर्व दृष्टीने मुलांना समृद्ध करण्याचे प्रयत्न पालकाकडून केल्या जाताना दिसून येते.

परंतु या सर्व सुखसोयी उपलब्ध करून दिल्यात, मुलांचे छंद जोपासले, मुलांना पाहिजे ते सर्व दिले म्हणजे पालकांचे कर्त्व्य संपले असे होत नाही. मुलांना खरी गरज जर कशाची असेल तर ती आपुलकीची, प्रेमाची आणि जिव्हाळयाची. आज पालक मुलांना सर्व सुखसोयी उपलब्ध करून देत असला तरी पालकांच्या कार्य वात्सल्यामुळे मुलांकडे त्यांचे काही प्रमाणात दुर्लक्ष होते. मुले बहुतेक काळ शाळा, मित्रमंडळी, नोकरचाकर यांच्या सहवासात घालवितात. कारण मुलांच्या वाट्याला आई–वडिल फारसे येतच नाही. यामुळे आपल्या मुलांच्या समस्या, अडचणी, प्रश्न जाणून घेण्यास पालकांना वेळ नसतो. दिवसाचा बराच काळ कामात जातो. उरलेला वेळ सभा, संम्मेलने, पार्टी, मिटींग यांच्यामध्ये जातो. आणि त्यामुळे मुल आई–वडिलांपासूनच दुरावते आणि याच करणाने बालकांची किंवा मुलांची प्रेमाची भूक भागली जात नाही. अशारीतीने मुले भावनिकदृष्टया दुरावतात. जिथे प्रेमळ माणसे मिळतील मिथे ही मुले रमतात व तिथेच त्यांना ओळ असते.

**पालक बालक संबंध :–** मुलांच्या व्यक्तिमत्व विकासात कौटुंबिक वातावरणाप्रमाणे पालक–बालक संबंध हा देखील महत्वाचा घटक आहे. आई–वडिलांनी मुलांचे संगोपन करण्याच्या जवाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक असते. त्याला आवश्यक असणारे प्रेम, आपुलकी, सहानुभूती, सुरक्षितता योग्य वेळी दिली जाते आहे की नाही याकडे लक्ष देणे आई–वडिलांचे पहिले कर्तव्य ठरते. पालक–बालक संबंधातूनच मुलाचे व्यक्तिमत्व घडत असते. हे संबंध प्रेमाचे, आपुलकीचे असतील तर ते व्यक्तिमत्व विकासाला पूरक ठरतात परंतु जर हे संबंध संघर्षपूर्ण, असमाधानकारक, नकारात्मक वृत्तीचे असतील तर मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला पोषक ठरणार नाही. विशेषतः आई–वडीलांच्या ज्या वृत्तीमूळे मुलांमध्ये वर्तनसमस्या आढळून येतात व अनिष्ट परिणाम घडतात, त्या वृत्ती खालीलप्रमाणे आढळून येतात.

**अतिसंरक्षण :–** एकुलता एक मुलगा असल्यास, मुले अल्प अयुष्यी असल्यास म्हणजे जास्त काळ वाचत नसल्यास, खुप उशीरा मूल झाल्यास, मूल सदैव आजारी पडत असल्यास, अनेक मुलीनंतर मुलगा झाल्यास किंवा मुलाचा जन्म झाल्यानंतर काही चांगल्या शुभ घटना घरात घडल्यास, मुलाचे जास्त प्रमाणात लाड केले जातात. मुलांची अवास्तव काळजी घेतली जात असल्याने त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडते. मुले अतिशय परावलंबी होतात. कोणत्याही समस्यानां तोंड देऊ शकत नाहीत. आत्मविश्वास नसलेली स्वतःच्या बळावर काहीही ठरवू न शकणारी अशी होतात. त्यांच्या वागणुकीत विक्षिप्तपणा आढळून येतो.

**नकारात्मक वागणुक :–** मूल नको असल्यास, मुलाचा जन्म झाल्यानंतर काही दुर्घटना किंवा अशुभ घटना घडल्यास, मूल कुरूप किंवा अल्पबुद्धीचे असल्यास, मुलांमध्ये शारीरिक व्यंग असल्यास, आईवडिलांना मूल नकोसे होते. अशा मुलांचा सूक्ष्म प्रकारे त्याग केला जातो. अशा मुलांचे सतत दोष दाखविले जातात, त्यांचाशी नीट बोलले जात नाही, त्या मुलाची इतर भावंडांशी तुलना केली जाते, मुलांकडे दुर्लक्ष केले जाते व त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. आईवडिलांकडून आवश्यक असलेले प्रेम मुलांना मिळत नाही. असा मुलगा प्रेमाचा भुकेला असतो. अशा वेळी चांगल्या–वाईट व्यक्तींचा विचार

न करता तो त्या व्यक्तींकडे आकर्षिला जातो. कधीकधी त्यामुळे वाईट मार्गाला जाण्याची शक्यता असते. अशा मुलांना आईवडिलांबद्दल अनादर असतो व असाच अनादर समाजातील इतर वडील मंडळीबद्दल दाखविला जातो. ह्या मुलांमध्ये बदला घेण्याची वृत्ती असते. आईवडिलांचा नकारात्मक वागणुकीमुळे मुलांच्या व्यक्तिमत्वावर परिणाम होतो. मुलांमध्ये न्यूनगंडाची भावना किंवा आक्रामक वृत्ती अधिक प्रमाणात निर्माण होते.

**मुलांमध्ये पक्षपात :–** आईवडिलांकडून सर्व मुलांना एकसारखे वागविले गेले नाही तर भावंडांमध्ये ईर्ष्या व द्वेष उत्पन्न होते. काही मुलांचे लाड अधिक प्रमाणात केले जातात, तर काही मुलांकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु हा वागणुकीचा सर्वच मुलांवर वाईट परिणाम होतो, तसेच त्यांच्यातील भांडखोर वृत्ती वाढते.

**आईवडिलांच्या मुलांकडून अपेक्षा :–** काही पालकांच्या आपल्या मुलांकडून वाजवीपेक्षा अधिक अपेक्षा असतात. अनेकदा त्या अपेक्षा इतक्या वरच्या दर्जाच्या असतात, की मुले त्यांच्या कसोटीला पुरेपूर उतरत नाहीत. ज्यांच्या अपेक्षा अतिशय जास्त आहेत, अश्या पालकांच्या वागण्यात कठोरपणा येतो. कित्येकदा सिनेमा पाहणे, कादंब–या वाचणे, सिनेमाची गाणी गुणगुणणे, पत्ते खेळणे इत्यादी लहानसहान गोष्टीतही मोकळेपणा दिला जात नाही. त्यामुळे मुलांच्या इच्छा सुप्त मनात दडलेल्या असतात. त्यांच्यासमोर ठेवलेले आदर्श आणि वास्तवता यामध्ये इतकी तफावत असते, की मुलांच्या मनात द्वंद्व चालू असते. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

**आईवडिलांची अवास्तव अधिकारवृत्ती आणि कडक शिस्त :–** काही पालक मुलांना अतिशय कडक शिस्तीत वाढवतात. मुले कुटुंबातील घटक आहेत, त्यांना स्वत्वाची भावना आहे, मान–अपमान आहेत, ह्या गोष्टींची जाणीव पालक ठेवत नाहीत. प्रत्येक बाबतीत पालकांचा अलहास असतो. माझे ऐकलेच पाहिजे, ही भावना असते. मुलांचा विचार केला जात नाही. वास्तविक पाहता बाहेर ज्या अनेक गोष्टी घडतात त्या मोकळेपणाने घरी येऊन सांगण्याची ओढ मुलाला वाटली पाहिजे. परंतु कडक शिस्त आणि अधिकारवृत्ती त्यामुळे पालक व बालक यामधील अंतर दुरावले जाते. त्यामुळे मुले मोकळेपणाने पालकांशी बोलत नाहीत व ब–याच गोष्टी पालकांच्या धाकाने त्यांच्यापासून लपवून ठेवतात. त्यांना वाईट सवयी जडू लागतात व पालकांना त्याची कल्पनाही नसते.

**सर्व मुलांना एकाच चाकोरीतून वाढविले जाते :–** प्रत्येक मुलाचा स्वभाव भिन्न असतो. मुलांच्या स्वभावातील भिन्नता लक्षात घेऊन त्यांना वाढविले पाहिजे. काही मुले हली असतात. ती लवकर ऐकत नाहीत. त्यांना रागवावेच लागते. हा उलट काही मुलांना नुसते समजावून सांगितले, तरी पटते. अशा मुलांवर रागवायची वेळ येत नाही. परंतु त्यांना रागावल्यास वाईट वाटते व मुले मनात कुढू लागतात. त्यांचे मनःस्वास्थ्य बिघडते व वागण्यात विकृती आढळते.

**पालकांच्या वागण्यातील अनिश्चितता :–** मुलांना वाढवितांना पालकांचे सतत मतपरिवर्तन होत असेल तर मुलांना कसे वागावे ? हे समजत नाही. मुलांच्या एकाच वागणूकीबद्दल कधी कौतुक होते, कधी दुर्लक्ष केले जाते, तर कधी शिक्षा मिळते. त्यामुळे आईवडिलांच्या आपल्याकडून काय अपेक्षा आहेत ? हे मुलांना निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळे त्यांचा गोंधळ होतो व त्यांच्या वर्तनात स्थिरता येत नाही.

**आईवडिलांच्या मतांमधील खंडन :–** आईवडिलांच्या मतांचे खंडन होता कामा नये. एकतर आईवडिलांचे क्षेत्र विभागलेले असावे किंवा दोघांनी विचारपूर्वक मुलांना कसे वाढवावे ? हे ठरवावे. परंतु एका व्यक्तिने सांगितल्यावर दुस–याने ते खोडून काढल्यास, किंवा त्याची निंदा केल्यास, मुलाला कोणाचे ऐकावे ? ते कळत नाही. त्यामुळे मूल परीस्थितीनुरूप स्वतःला जे योग्य वाटेल व श्रेयस्कर ठरेल त्याचे अनुकरण करते. परंतु त्यामुळे घरातील शिस्त बिघडते व मुलांना योग्य वळण लागत नाही.

**मुलांचे दोष लपवून ठेवण्याची पालकांची वृत्ती :–** मुलांमध्ये वर्तनसमस्या निर्माण होण्याला पालकांची मुलांचे दोष लपवून ठेवण्याची वृत्तीदेखील तेवढीच कारणीभूत आहे. काही पालकांना असे वाटते की, मुलांमधील दोष अनुवांशिक आहेत किंवा आपल्या घरातील दूषित वातावरणामुळे निर्माण झालेले आहेत. मुलांच्या दोषाला आपण स्वतः कारणीभूत आहोत व दोष आपल्यावर लादला जाऊ नये, म्हणुन मुलांमधील दोषावर उपाय करण्या ऐवजी दोष लपविण्याचा प्रयत्न केला जातो, त्यामुळे दोष स्थायी रूप धारण करतात.

**इतरांसमक्ष मुलांच्या दोषांची चर्चा करणे :–** बरेचदा पालक आपल्या मुलांच्या दोषांचे वर्तन इतरांसमोर करतात. कधीकधी हा थलेचा विषय होतो व मुलाला संकोचल्यासारखे होते. त्यांच्या बालमनाचा अपमान झाल्यासारखा वाटतो. मुलाच्या वागणुकीत विकृती येते किंवा आपण विचित्र त–हेने वागलो तर आईवडिलांचे लक्ष आपल्याकडे केंद्रित करून घेता येते, ही जाणीव मुलांना होते व त्यामुळे मुले दोषांची पुनरावृत्ती करतात व एक अस्त्र म्हणून वर्तनसमस्यांचा उपयोग करतात.

अशा प्रकारे पालक व बालक यांचे संबंध योग्य नसल्यास अनेक समस्या निर्माण होतात. कित्येकदा आईवडिल आनुवांशिकतेवर खापर फोडून मोकळे होतात

पण आपले काही चुकत आहे ते शोधून काढून मुलांचा योग्य विचार त्यांच्याकडून केला जात नाही.

या सर्व कारणास्तव आजही पालकाकडून मुलाची उपेक्षा होऊ शकते. ही मुले पुढे बालगुन्हेगार होतात. खुनशी प्रवृत्ती, आक्रामक वृत्तीची होतात. पुढे वैवाहिक जिवनात अयशस्वी होतात. स्वतःच्या मुलांची देखील उपेक्षा करतात. तेव्हा सर्व दुरगामी परिणाम टाळण्यासाठी निरोग आणि निकोप विकास मुलांचा होणे आवश्यक असते. त्यासाठी आपले मूल जसे आहे तसे स्वीकारण्याची आईवडिलांची वृत्ती पाहिजे. आपल्या मुलावर मनापासून प्रेम करावे, चांगल्या गुणंचे कौतुक करावे अशी इच्छा मनात असूनही आजच्या धकधकीच्या, शहरी वातावरणातून पालकांना यासाठी देखील वेळ नसतो असे म्हणावे लागते.

काही मुलांना पालकाकडून आवश्यकतेपेक्षा जास्त संरक्षण मिळते. उदा. लग्नानंतर बरेच वर्षानंतर झालेले मूल, मुलीच्या नंतर झालेला मुलगा.

आई वैवाहिक जीवनात सुखी नसेल व मुलाला सर्वस्व मानत असेल तर त्यांचे अतिसंरक्षण होते. कधीच स्वावलंबी बनू शकत नाही. परावलंबी, भित्री, माघारी फिरणारी वृत्तीची हि मुले असतात. हे सर्व टाळण्यासाठी मुलांना निरनिराळी कामे स्वतंत्र करण्यास प्रोत्साहन व संधी दिली पाहिजे. पालकांकडून मुलांच्या वाजवी इच्छा पुरविल्या जावे, मुलाचे सामाजिक समायोन निट व्हावे, त्यात अडचणी निर्माण होऊ नये म्हणून मुलांच्या हट्टांना लहानपणीच मुरड घालणे शिकविले पाहिजे. यासाठी थोडे शिस्तीने वागावे लागले तरी चालेल. याचा अर्थ मुलांना खुप बंधनात ठेवावे असा मात्र नाही. परंतु पालकाची अवाजवी, वात्सल्य, प्रेम आणि शिस्त लावण्याकरिता आवश्यक असलेली कडक वागणूक याचा सुवर्णमध्य साधणे मुलांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने महत्वाचे असते.

आजच्या शहरी वातावरणात सर्वत्र झगमगाहट, विविध आकर्षणे दिसतात. या सर्व आकर्षणांना कुमार वयातील मुले चटकन बळी पडतात. यासाठी पालकांनी मुलाकडे पुरेसे लक्ष पुरविणे आवश्यक ठरते. मुले घराबाहेर प्रेमाच्या शोधात जाणार नाही, त्याचे दुसरीकडे वाकडे पाऊल पडणार नाही. यासाठी आई—वडिल व मुले यांच्या जवळकीची, मोकळेपणाचे संबंध असणे ही सर्वात महत्वाची बाब ठरते. म्हणून बदलत्या परिस्थितीत माता—पित्यांचे घरातील अस्तित्व ही मोलाची बाब ठरत आहे. आजच्या मातेला आपल्या अपत्यावर नीतीचा, माणुसकीचा संस्कार करावयाचा आहे.

उच्चभ्रू मातांना पैशाचा फारसा प्रश्न नसतो. त्या मुलांना पॉकेट मनी देतात. आजच्या काळात जो पॉकेट मनी कोणत्या गरजेसाठी वापरायचा हेही मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

बालकाची माता सुशिक्षित, अशिक्षित, श्रीमंत—गरीब, सम्मान्य, परित्यक्ता, घटस्फोटित यापैकी कोणत्याही स्वरूपात माता म्हणून भूमिका बजावत असतात. अनेक आव्हानांना तिला तोंड द्यावे लागते. समाजजीवनात आपले मूल जेव्हा प्रवेश करेल तेव्हा त्यांच्या प्रवेशाने उमटलेले पाऊल माणसाचेच असेल, मानवाचे असेल ते दानवाचे नाही. यासाठी मातांनी/पित्यांनी देखील आपली पालकाची भूमिका जाणिवपूर्वक पार पाडणे हे आव्हान स्वीकारण्याची गरज आहे.

---

**संदर्भ ग्रंथ :**

1. प्रा. त्रिवेणी फरकाडे आणि सौ. सुलभा गोंगे, विवाह आणि कौटुंबिक संबंध, विद्या प्रकाशन, रूईकर रोड, नागपूर, 1999.
2. डॉ. नलिनी वराडपांडे, बालविकास, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 1981.
3. डॉ. सौ. ज्योती गायकवाड, बालविकास शास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, तरूण भारत जवळ, रामदासपेठ, नागपूर, 1996.

# ग्रंथालयीन संदर्भसेवा

**प्रा. रंजना बी व्यवहारे,** विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, 310—ब, न्यु नंदनवन, नागपूर

**प्रस्तावना :—** आज ज्याला आपन ग्रंथालय म्हणतो, ते विविध नावाने ओळखल्या जातात. त्याला वाचनालय असे म्हणतात. पेशवाईच्या काळात त्याला ''पोथीघर'' नावाने ओळखले जात असे. हजारो वर्षापुर्वी मानवाने आपल्या भावभांवनाचा अविष्कार करण्यासाठी व भविष्यातील मानवाला समजण्यासाठी काही महत्वाच्या गोष्टी खडक किंवा दगडावर कोरुन ठेवण्यास सुरुवात केली होती. आपल्या मनातील भाव लिखित स्वरुपात व्यक्त करण्यासाठी मानवाने प्रथम चित्राकृतीचा अथवा चित्रलीपीचा आधार घेतला. चित्रकृती म्हणजे लिखाणाचा प्रांरभ म्हणायला हरकत नाही. नंतर अक्षरबध्द व मग शब्दबध्द झाली. यातूनच मानव संस्कृतीच्या पाऊलखुणा शब्दबध्द झाल्या पुढे अनेक भाषाचा उगम व विकासही झाला व अनेक कला भाषेतून साकार होऊ लागल्या. त्यामुळेच विकास व प्रसारही झाला.

या जगात अफाट ज्ञान आहे आणि जिज्ञासू वृत्तीच्या माणसाला हे अफाट ज्ञान मिळविण्याची लालसा असते हे अफाट ज्ञान त्याने नव्या नव्या प्रयोगाने व अनुभवाने आत्मसात करुन त्यात भर टाकत राहिला. कित्येक वर्ष ही प्रकिया चालत राहिली. नंतर लिहिण्याची कला अवगत झाल्यावर हे ज्ञान ग्रथित स्वरुपात पुढील पिढीसाठी जतन करुन ठेवले जाऊ लागले. पुर्वी ग्रथालये म्हणजे ज्ञानसाधनाची कोठारे आणि ग्रंथपाल म्हणजे रखवालदार राहत असे. भारतात तक्षशीला, नांलदा, विक्रमशीला कांशी अशी शेकडो विद्यापाठे निर्माण झाली. हजारो वर्ष या विद्यापीठाने ज्ञानदानाचे कार्य करुन ग्रंथालयाची जोपासना केली. आधुनिक काळात ग्रंथालयाचे आणि ज्ञानसाधनाचे स्वरुप बदलत आहे. पुर्वीच्या स्वरुपातील ग्रंथालय आज नाही व आजची ग्रंथालये उद्या राहणार नाहीत. पण ज्ञान संक्रमणाचे कार्य मात्र सतत चालत राहणार आहे. वाचक हा ज्ञान लालसेसाठी सतत उत्तेजित राहावा आणि सतत नवनवीन ज्ञानाची दालने उधडून बघावे याकरिता ग्रंथालये आणि त्यातील सेवक वर्ग सुसज्ज राहायला पाहिजे. योग्यवेळी योग्यवाचन साहित्याची योग्य वाचकांशी सांगड घालण्याचे काम ग्रंथपाल व ग्रंथालयातील सेवक वर्गाचे असते. याकरिता योग्य तंत्रज्ञान हाताळू शकतात.

**संदर्भसेवा :—** ग्रंथालयाची सर्वसाधारण संकल्पना म्हणजे वाचकाने पुस्तक मागायचे आणि ग्रंथपालाने ते द्यायचे म्हणजेच पुस्तकांची देवाणघेवाण जिथे होते ते ग्रंथालय होय हा सर्वसाधारण समज आहे. पण आधुनिक काळात ग्रंथालयातून अनेक प्रकारच्या सेवा दिल्या जातात त्यातीत एक सेवा म्हणजे संदर्भ सेवा होय. ग्रंथालयातील संदर्भ सेवा हे ग्रंथपालाचें महत्वाचे कार्य बनत चालले आहे. ग्रंथालयाचे उदिदष्ट साध्य होण्याकरिता ग्रंथालयातील संदर्भ सेवा हा एक महत्वाचा घटक मानला जातो. वाचकास हवे असलेले ग्रंथ आणि वाचनीय साहित्य देणे हे संदर्भसेवेचं प्रमुख अंग आहे. ज्या अनेक साधनाद्वारे वाचकांची ज्ञानलालसा पूर्ण करण्याचा प्रयत्न ग्रंथपाल करतो त्या सेवेस संदर्भ सेवा असे म्हणतात.

**व्याख्या :— डॉ. षि. रा. रंगनाथन** यांचे मते, ''संदर्भ सेवा म्हणजे वाचकाला हवी असलेली माहिती नेमकी परिपूर्ण आणि तत्परतेने मिळावी यासाठी ग्रंथ व इतर वाचन साहित्याचा शोघ घेण्यासाठी दिली जाणारी व्यक्तीगत सेवा होय.'' **अमेरिकन लायब्ररी असोसिएषनची ग्लॉसरी ऑफ लायब्ररी टर्म्स** च्या नुसार, ''ग्रंथालयातील सेवामधील एक महत्वाचा भाग म्हणजे अभ्यास आणि संषोधनासाठी ग्रंथालयातील साधनामधून वाचकांना माहिती शोधण्यासाठी प्रत्यक्षपणे थेट किंवा वैयक्तीकरित्या दिलेले सहकार्य म्हणजे संदर्भसेवा होय''.

**संदर्भ सेवेची आवष्यकता :—** 1. अनेक नवीन ग्रंथाची निर्मिती व त्यातही विविधता. 2. वाचकांच्या माहीतीविषयक गरजांची सखोलप्रमाणात वाढ. 3. ग्रंथालयाची दिवसेंदिवस सर्वांगीन होणारी वाढ. 4. ग्रंथालयातील गुंतागुंतीचे व्यवस्थापन. 5. ग्रंथालयातून विस्तृत सेवा देण्यासाठी वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली. 6. ग्रंथालयावर आधुनिक तंत्रज्ञानाचा असणारा प्रभाव. 7. वाचकांना कमी वेळेत जास्त माहिती मिळण्याची जिज्ञासा. 8. संशोधनाला जास्तीत जास्त प्रमाणात प्रोत्साहन मिळावे याकरिता संदर्भ सेवेची प्रभावी सेवा दिल्या जाते.

**ग्रथालयातील संदर्भ साधने** :— शब्दकोश, ज्ञानकोश, ग्रंथसूची, वार्षिक, चरित्रकोश. याशिवाय नियतकालिके, माहितीपुस्तके, नकाशे, स्थलवर्णनकोश, मार्गदर्शिका—डिरेक्टरीज, संकीर्ण ग्रंथ अहवाल, शोधनिबंध, प्रबंध, निर्देश इ. साहित्य हे संदर्भ साहित्य या व्याख्येत गणले जातात.

**ग्रंथालयातून दिल्या जाणा—या संदर्भ सेवा** :— 1. विशिष्ट विषयावर सूची तयार करणे. 2. प्रचलीत जागरुकता सेवा. 3. वृत्तपत्र कात्रणसेवा, निर्देष सेवा, सारलेखन सेवा. 4. ग्रंथालयाचा परिचय करुन देणे. 5. अनूवाद सेवा. 6. प्रतिरुप लेखन सेवा.

ग्रंथालयात येणा–या नवीन वाचकास ग्रंथालयाची पूर्ण माहिती दयावी. जसे ग्रंथालयाचे नियम कोणते आहेत, ग्रंथालयाचे सभासद होण्यासाठी काय करायला पाहिजे. एकावेळेस किती पुस्तके मिळतील, पुस्तक गहाळझाल्यास किती दंड भरावा लागेल, ही सर्वसाधारण माहिती द्यायला हवीतसेच ग्रंथालयातील संपूर्ण वाचन सहित्याचीही ओळख करुन द्यायला हवी. ग्रंथालयातील सर्व वाचन साहित्याची यादी तयार करणे म्हणजे तालिका होय. ही तालिकायादी कशाप्रकारे तयार केली आहे, नोंदींची रचना कशी आहे , त्याची शिर्षके कशी निवडली आहेत याविषयाचे मार्गदर्शन वाचकांना करणे आवश्यक आहे.

वाचकांना संदर्भ ग्रंथाची ओळख करुन देऊन संदर्भ ग्रंथ कसे पहावे याविषयीचे मार्गदर्शन वाचकांना करायला पाहिजे. ग्रंथालयात शब्दकोष, ज्ञानकोष कसा पहावा, वार्षिकामधून माहिती कषी घ्यायची हयाबद्दलची माहिती वाचकांना द्यावी. ग्रंथालयात वाचकांना हवी असलेली माहिती ग्रंथालयातील वाचनसाहित्यामधून शोधून द्यावी. जसेः एखादया थोर व्यक्तीविषयी माहिती पाहिजे असेल तर ती शोधून देणे आणि समजा ग्रंथालयात नसेल तर दुस–या ग्रथालयातून आपल्या जाणकार व्यक्तीकडून ती माहिती उपलब्ध करुन देणे. ग्रंथालयात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन संदर्भ सेवा दिल्या जातात.जसे वाचकांना एखादया विषयासंबधेत सी.डी. तसेच दृक–श्राव्य फिती दाखवून त्यातून त्यांना पाहिजे ते घेऊ शकतात.

**विविध ग्रंथालयातील संदर्भ सेवा** :– ग्रंथालयात येणारे वाचक अनेक प्रकारचे असतात. ग्रंथालयात येणा–या वाचकांवरुन म्हणजेच वाचकांच्या स्तरावरुन ग्रंथालयाचे विविध प्रकार पडतात. जसे 1. सार्वजनिक ग्रंथालये, 2. शैक्षणिक ग्रंथालये व 3. विशेष ग्रंथालये.

1. **सार्वजनिक ग्रंथालये :–** सार्वजनिक ग्रंथालयात येणारे वाचक सर्व स्तरातील म्हणजे लहाण्यापासून मोठयापर्यतस्त्री–परुष गरिब–श्रीमंत असतात.त्यामुळे येथील वाचकांच्या मागण्या वेगवेगळया प्रकारच्या असतात. लहान मुलांना त्याच्यानुसार म्हणजे छोटी छोटी गोष्टींची पुस्तके, काही प्रयोगपर पुस्तके छोटी मासिके, चित्रे असलेली, आकृत्या असलेली आकर्षक पुस्तके त्यांना जास्त प्रमाणात आवडतात. या वयातल्या वाचकांसाठी काही शब्दकोष, ज्ञानकोष असतात , काही जादुचे प्रयोग करणारे ,विज्ञानपर पुस्तके त्यांना उपयुक्त ठरणारे असतात. तर स्त्रीयांची, आबाल वृद्धांची आवड वेगळी असते. त्यानुसार त्यांना संदर्भसेवा पुरवावी लागते.

2. **शैक्षणिक ग्रंथालये :–** सार्वजनिक ग्रंथालयानंतर शैक्षणिक ग्रंथालयाचा विचार समारे येतो. शैक्षणिक ग्रंथालयात शालेय ग्रंथालय, महाविद्यालय ग्रंथालय, आणि विद्यापीठ ग्रंथलयांचा समावेष होतो. शालेय ग्रंथालयात येणारे विद्यार्थी 6 ते 15 वर्ष वयोगटातले असतात. त्यांची जिज्ञासू वृत्ती राहते. प्रत्येक गोष्टींचा चिकित्सकपणे विचार करतात. वर्गात ~~शिकवलेली प्रत्येक गोष्ट आपल्या परिने तपासण्याचा प्रयत्न~~ करतात. तसेच काही विज्ञानपर पुस्तक वाचून प्रयोग करण्याचा प्रयत्न करतात. त्याअनुषंगाने त्यांना संदर्भ पुस्तके पुरवावी लागतात. यानंतर महाद्यिालयात येणारे विद्यार्थी थोडया प्रमाणात परिपक्व झालेली असतात. महाविद्यालयात असणा–या शाखानुसार त्यांना संदर्भ सेवा पुरवाव्या लागतात. त्यांना अभ्यासक्रमानुसार संदर्भ सेवा पुरवाव्या लागतात. त्यासोबतच त्यांना स्पर्धा परिक्षा, वक्तृत्व स्पर्धा, निंबध स्पर्धा, यानुसारही त्यांना संदर्भ पुरवावे लागतात. तसेच विद्यार्थांच्या विकासात वाढ व्हावी म्हणून व्यक्तीमत्व विकासावर असणारी, तसेच बुध्दीला चालना देणा–या बौध्दीक क्षमतेवर आधारीत असलेली स्पर्धा परिक्षेची पुस्तकेदयावी लागतात.

विद्यापीठ ग्रंथालयात येणारा वाचक वर्ग हा वरच्या स्तरावरिल असतो.त्यांना संषोधनात्मक व्यापक स्वरुपात संदर्भ सेवा दयावी लागते. हा वाचक चिकित्सक स्वरुपात अभ्यास करणारा संषोधक असतो. त्याच्या संषोधनाला पुरक संदर्भ सेवा पुरवावी लागते. विद्यापीठ ग्रंथालयात स्वतंत्र संदर्भ विभाग असतो. तिथूनच त्यांना सर्व सेवा पुरविल्या जातात.

3. **विषेष ग्रंथालये :–** विशेष ग्रंथालयात येणारा वाचक वर्ग हा सर्वसाधारण वाचकवर्ग नसून ता विशिष्ट प्रकारचा वाचक वर्ग असतो. या प्रकारच्या ग्रंथालयात एका खास विशेष गोष्टीवर भर दिल्या गेला असतो. यात संशोधन, औद्योगिक, व्यवसाय विषयक, कारागृहातील लोकांसाठी, अंधासाठी, संगित, कायदा विषयक, अशी विविध विषयासांठी विशेष ग्रंथलय असतात. त्यानुसार तेथील वाचकांना संदर्भ सेवा पुरवाव्या लागतात.

**निष्कर्ष** :– ग्रंथालय ही विस्तृत संकल्पना आहे. त्यात ज्ञानाचा साठा भरलेला असतो. त्या ज्ञानाच्या साठयामधून वाचकांना नेमकी माहिती मिळविणे कठीण जाते. याकरिता ग्रंथालयातील सेवा उपयोगी ठरतात. ग्रंथालयातून दिल्या जाणा–या सेवा मधून संदर्भ सेवा फार महत्वाची मानली जाते कारण ग्रंथालयात येणारे वाचक अनेक प्रकारचे असतात. त्यांच्या मागण्या वेगवेगळया असतात त्या पूर्ण करणे ग्रंथालयाचे कर्तव्य आहे.पण काही वाचक असे असतात की त्यांच्या मागण्या या वेगळया प्रकारच्या असतात त्या पूर्ण करतांना त्यांना विषेष प्रकारच्या सेवा द्याव्या लागतात ती सेवा म्हणजे संदर्भ सेवा होय.आधुनिक ग्रंथालयात संदर्भ सेवामहत्वाची मानल्या गेली आहे.

---

**संदर्भसूचीः–**

1. बावनकर, सौ. हर्षदा भुरे : ग्रंथालय : संदर्भ सेवा, श्लोक पब्लिकेशन,पुणे. 2010
2. डॉ. करमकर, प्रकाश : ग्रंथालयीन संदर्भसेवा, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे. 2012
3. पवार, शंकर पा. : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.2009

**प्रा. कविता के. लेंडे**, वाणिज्य विभाग, एस.एन. मोर महाविद्यालय, तुमसर.

**प्रस्तावना** :– विकासाच्या प्रक्रियेत तेजीमंदी अव्याहतपणे सुरू असते. त्यातच मंदीची अवस्था अनेक समस्यांना निर्माण करून जाते. पहिल्या आणि दुसऱ्या जागतीक महायुध्दामूळे अनेक राष्ट्र संकटात सापडली. याच कालावधीत सशक्त व स्थिर अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेने इतर राष्ट्रांना कर्ज पूरवठा केला. त्यामूळे सर्व इतर राष्ट्रांसमोर अमेरिकेचे कर्ज परतफेड करणे हे एक आव्हाणच होते. अमेरिकेच शेअर बाजार 1929 च्या सुरवातीपासूनच अस्थिर होता. व त्यातच अमेरिकेत शेअर्स धारकांचे एकूण 40 अब्ज डॉलर्स इतके प्रचंड नुकसान झाले. 1929 च्या जागतीक महामंदीचे कारण शेअर बाजार कोसळणे व बॅकाचे दिवाळे निघणे असे निदर्शनास येते.

जागतिकीकरणामूळे सर्व राष्ट्र एकमेकांशी जोडल्या गेले. जागतीक पातळीवर एक बलाढय राष्ट्र व एक स्थिर व सुरक्षीत अर्थव्यवस्था अशी अमेरिकेची प्रतिमा असल्याने जगातील बहुतांश राष्ट्राने अमेरिकेचा व्याजदर कमी असला तरी गुंतवणुकीत अमेरिकेला प्राधान्य दिले. त्यामूळे अमेरिकन आर्थिक व्यवस्थेत मोठया प्रमाणावर वाढ होवून गृहकर्ज व कारलोन देण्यास अमेरिकेने सुरूवात केली. परिणामतः गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने गृहकर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अमेरिकेत मोठया प्रमाणावर वाढले परंतू कर्ज परतफेडीचे प्रमाण कमी झाले. अपात्र कर्जदारांना दिलेल्या प्रचंड गृहकर्जातून उद्भवलेल्या आर्थिक संकटाचा स्फोट 2008 च्या सप्टेंबर मध्ये झाला. परिणामतः कर्ज देण्यास जवाबदार असणाऱ्या वित्तिय संस्था व गुंतवणूकदार बॅका उदा. लेहमन ब्रदर्स, बिअर स्टनर्स, बी एन पी पॅरिक्स, नॉर्दन रॉक, मेरिल लिंच हया सर्व बॅका रसातळाला गेल्या हे संकट एवढे गंभीर होते की, अमेरिकेला पैशाची टंचाई भासु लागली त्यातच अमेरिकेतील हाऊस ऑफ रिप्रेजेंटेटीव्स ने अमेरिकन सरकारला 'शट डाऊन' च्या स्थितीत आणून ठेवले आणि त्यातच फेडरल बॅकेने बाजारातील डॉलर्स चा ओघ खळखळत राहावा म्हणून रोख्याच्या स्वरूपात डॉलर्स बाजारात सादर केले, त्याचा अनेक छोटया मोठया उद्योगांनी फायदा घेतला. हळूहळू संकटाची तिव्रता कमी होत गेली आणि फेडरल बॅकेने आपल्या तर्फे बाजारात केला जाणारा डॉलर्सचा पुरवठा कमी केला जाईल किंवा पूर्णपणे थांबविला जाईल असे संकेत देताच जगभराचे शेअर्स बाजार हादरले व गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक काढून घ्यायला सुरवात केली. सर्व अमेरिकन अर्थव्यवस्था हादरायला लागली. हया आर्थिक संकटाची व्याप्ती अमेरिकेपुरतीच मर्यादित न राहता युरोप, जपान, आशिया, असे सर्व जग संकटात सापडून वित्तिय पुरवठयात घट होत गेली. व हयाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही दिसून आला. 2008 च्या मंदीची तिव्रता ही 1929 च्या महामंदी पेक्षाही भयंकर आहे. असे अर्थशास्त्रज्ञांनी विदित केले आहे. 2008 ची मंदी ही अमेरिकेची देण आहे असे संबोधले जाते.

**मंदी** :– ''एका निरंतर कालावधीमध्ये सामान्य आर्थिक घडामोडीत घट होणे किंवा व्यापार चक्राचे संकुचन पावणे अर्थशास्त्राच्या भाषेत व्यापारीक मंदी होय. जेव्हा कमीत कमी दोन तिमाहीत वास्तविक आर्थिक विकासात संकुचन झाला असेल, तसेच 12 महिण्याच्या आंत बेरोजगारीत 1.5 टक्यांची वृध्दी म्हणजे मंदीची स्थिती होय.''

''अनेक प्रकारच्या घटकांच्या प्रभावामूळे जेव्हा जागतीक आर्थिक विकासाचा दर 3 टक्के किंवा त्यापेक्षा कमी होतो. त्याला मंदी असे म्हणतात.''

''भांडवलाच्या सिमांत लाभक्षमतेत होणाऱ्या बदलाच्या दरात चढउतार झाल्याने व्यापारचक्र निर्माण होवून भांडवलाची सिमांत लाभक्षमता घटल्यामुळे मंदीला सुरूवात होते.''

'' नवीन शोध कार्यान्वीत करण्यास घेतलेल्या कर्जामुळे मंदीची लाट येते.''

''पैशाच्या पुरवठयातील बदल व्यापारचक्राचे कारण असते. रोखतेची दुर्मिळता निर्माण झाल्यामुळे व्यापारी अधिकोष प्रत्यय संकोचाचे धोरण स्वीकारतात. त्यातून व्याजदर वाढतो व पूढे अर्थव्यवस्थेची मंदीकडे वाटचाल सुरू होते.

**जागतीक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभावः–**

**विकास दरावर प्रभाव** (Effect on GDP) – जागतीक मंदीचा भारतीय विकास दरावर प्रतिकुल परिणाम दिसून येतो. काही वर्षातील विकासदर पूढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 2005 – 06 | 9.5 टक्के |
| 2006 – 07 | 9.6 टक्के |
| 2007 – 08 | 9.3 टक्के |
| 2008 – 09 | 6.8 टक्के |
| 2009 – 10 | 8.00 टक्के |
| 2010 – 11 | 8.6 टक्के |
| 2011 – 12 | 4.9 टक्के |
| 2012 – 13 | 4.8 टक्के |

वरील आकडेवारीवरून दिसून येते की, आर्थिक विकास दर मंदीच्या लाटेमुळे कमी कमी होत गेला.

**सेवा क्षेत्रावर प्रभाव** (Effect on service sector) :– मंदीमूळे उत्पादनात घट झाल्याने त्याचा परिणाम भारतीय सेवा क्षेत्रावर झालेला दिसून येतो. सेवा क्षेत्रात जेव्हा

निर्देशांक 50 पेक्षा खाली जातो. तेव्हा ती संकुचनाची स्थिती असते. 2013 मध्ये ही संकुचन क्षमता 46.7 टक्के होती.

**औद्योगिक क्षेत्रावर प्रभाव** (Effect on Industrial sector) :— जागतीक मंदीच्या प्रभावामूळे ग्राहकांकडून औद्योगिक उत्पादनाला कमी मागणी येते. औद्योगिक उत्पादन निर्देशांकानूसार औद्योगिक उत्पादनात 2007—08 मध्ये 8.7 टक्के वाढ झाली. पण 2008—09 मध्ये ती वाढ घसरून 3.2 टक्के ऐवढी झाली तर 2013 मध्ये ही घट 2. 1 टक्के दिसून आली कारण इलेक्ट्रानिक्स व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील वस्तुच्या उत्पादनाची झालेली घट होय.

**भारतीय निर्यातीवर प्रभाव** (Effect on Export) :— मंदीमूळे भारताच्या निर्यात क्षेत्रात पूढील प्रमाणे घट दिसून आली.

पेट्रोलिअम निर्यात — 31.1 टक्के
रत्न आभुषण — 9.3 टक्के
लोहव्यवसाय — 13.31 टक्के
हस्तउद्योग — 54.73 टक्के
कॉफी — 21.00 टक्के
कापड — 1.71 टक्के
औषध — 1.9 टक्के

मंदीमूळे भारताच्या निर्यात क्षेत्रात वरीलप्रमाणे घट दिसून येते.

**भारतीय स्कंध विपणीवर प्रभाव** (Effect on stock Exchange Market) :— भारतीय स्कंध विपणीवर नेहमी अस्थिर वातावरण असते. स्कंध विपणीवर मंदीचा तसेच राजकीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचा प्रभाव दिसून येतो. म्हणूनच संसेक्स नेहमी कमी जास्त होत असतो.. हा संसेक्स पूढील प्रमाणे —

जाने. 2008 — 20783
ऑक्टो. 2008 — 8000 वर बंद झाला
जाने. 2013 — 21373.66
नोव्हें. 2013 — 20420.26

वरील प्रमाणे मंदीमूळे BSE वर अस्थिरतेचे वातावरण दिसून येते.

**भारतीय बॅकींग क्षेत्रावर प्रभाव** (Effect on Banking Sector) :— मंदीमूळे रिअल ईस्टेट व वाहन क्षेत्राची विक्री घटली, उद्योग क्षेत्रातील मोठया विस्तार योजना ठप्प पडल्या त्यामुळे कर्जाची मागणी घटून बॅकाची मोठी कर्ज अडचणीत आली. परंतू भारतीय बॅकीग क्षेत्राच्या दुसऱ्या बाजुचा विचार केल्यास भारतीय बॅकींग क्षेत्र केंद्रीय अधिकोषाव्दारे नियंत्रीत असल्याने अमेरीकेतील बॅकीग संकटाचा प्रभाव भारतीय बॅकीगवर फारसा पडला नाही. कारण भारतीय बॅकानी तरलतेच्या समस्यांची सोडवण करण्यासाठी पर्सनल लोनच्या व्याजदरात घट करून नविन ग्राहक मिळविण्यासाठी शहरापासून तर गावापर्यंत शाखांचा विस्तार करून 2013 या वर्षात विविध बॅकानी देशभरात 7300 नविन शाखा सुरू केल्या.

**भारतीय विद्युत उद्योगावर प्रभाव** (Effect on Electric Industries) :— मंदीमूळे पट्रोलियम पदार्थाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे विद्युत उद्योगाला नुकसान होवून उर्जा बाजारावर तसेच विद्युत उद्योगावर मंदीचा परिणाम दिसून हया क्षेत्राला करोडो रूपयांचे नुकसाान सहन करावे लागले.

**भारतीय वाहन उद्योग क्षेत्रावर प्रभाव** (Effect on Automobile Sector) :— तरलतेच्या कमीमुळे व जास्त व्याजदरामूळे वाहनांची मागणी मंदीकाळात घटली. वाहन उद्योगात साधरणतः 17.2 टक्के वाढ होत असते. पण मंदीकाळात फक्त 7 ते 8 टक्के वाढ झाली. मंदीमूळे बॅका तसेच वाहन कर्ज देणाऱ्या बॅका, वाहन विमा उद्योग यावर प्रतिकुल प्रभाव दिसून आला. त्यामुळे वाहन कंपन्याच्या व्यवसायात 8 टक्के घट दिसून आली.

**रोजगारावर प्रभाव** (Effect on Employment) :— मंदीचा महागाईवर वाढता दबाव यामूळे भारतीय कंपन्याना प्रामुख्याने रोजगार इच्छुकांना मोठा फटका बसु लागला आहे. श्रम मंत्रालयाच्या सर्वेक्षणानूसार 2008 च्या समाप्त झालेल्या तिमाहीत पाच लाख लोकांना नोकऱ्या सोडाव्या लागल्या वाहन आणि परिवहन क्षेत्रात 2008 मध्ये 12.45 टक्के आणि 10.8 टक्के अनुक्रमे घट झाली. तर मॅन्युअल कामगारांच्या रोजगारात म्हणजे रत्न व आभुषणाच्या उद्योगात 9.97 टक्के, धातु उद्योगात 1.33 टक्के अशी घट दिसून आली. 2012 च्या तुलनेत 2013 या वर्षात पहिल्या तिमाहीत रोजगाराचे प्रमाण 20 टक्याने घटले आहे.

**विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीवर प्रभाव** (Effect on FDI) :— जागतीक मंदीच्या काळात विदेशी गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक भारतीय बाजारातील अनिश्चिततेच्या वातावरणाच्या भीतीपोटी काढून घेतली आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम अनेक उद्योगक्षेत्रांवर व स्कंधविपणीवर पडला त्यामूळे बाजारात अस्थिरता निर्माण झाली. 2007—08 मध्ये परकीय संस्थागत गुंतवणूक (FII) भारतात 16040 मिलियन डॉलर एवढी होती पण एप्रिल ते नोव्हेंबर 2008 च्या दरम्यान ती कमी होवून 8857 मिलिअन डॉलरवर आली. सेबीनूसार 2013 या संपूर्ण वर्षात 96461 करोड रूपयांची गुंतवणूक झाली.

**भारतीय रूपयावर प्रभाव** (Effect on Indian Currency) :— जागतीक मंदीमूळे डॉलरच्या तुलनेत रूपयाचा दर हा सतत बदलत आहे. हा दर

अर्थव्यवस्थेसाठी प्रतिकुल अरहे. 2013 मध्ये डॉलरच्या तुलनेत रूपया 10 टक्के पेक्षा जास्त कमजोर झाला व सोने महाग झाले. 17 ऑगष्ट 2013 ला रूपयाने एका डॉलरला 62 रू. मोजले. व एक ऐतिहासिक निचाकांची पातळी गाठली ही अस्थीरता आजही दिसून येते.

थोडक्यात खाऊजा ( खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणामूळे 2007–08 मध्ये मंदीच्या काळातही भारताने 9 टक्के विकास दर गाठला होता. त्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेवर मंदीचा परिणाम हळूहळू वरील सर्व क्षेत्रावर दिसून आला. आणि 2013 मध्ये 9 टक्के असलेला विकासदर 4.8 टक्के पर्यंत कमी झाला. जो गेल्या दहा वर्षातील सर्वात कमी विकासदर आहे.

**निष्कर्ष** :– जागतीक मंदीमूळे भारतीय अर्थव्यवस्थेवर जो प्रतिकुल परिणाम दिसून आला त्याला जवाबदार मंदीसोबतच केंद्रीय बॅकेची मौद्रिक निती, देशातील अस्थिर राजकीय वातावरण, विदेशी गुंतवणूक, पेट्रोलिअम पदार्थाच्या किंमती इत्यादीही जवाबदार आहेत. इतर राष्ट्रांशी तुलना केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेची तिव्रता कमी दिसून येते. त्यामुळे जगातील दुसरी सर्वात मोठी भारतीय अर्थव्यवस्था विशेष डळमळीत झाली नाही. कारण कृषी विकासदराने भारताला सावरले. भारतीय अर्थव्यवस्था रूळावर येत असली तरी परिस्थिती सुधारण्यास बराच वेळ लागेल. कारण अर्थव्यवस्थेत घसरत जाणारा बचतदर, वाढत जाणारी तूट, सरकारी पगार व अन्य खर्चाचा होणारा भरमसाठ ताण, शिक्षण, आर्थिक वाढ, औद्योगिक वाढ, गुंतवणूक, भ्रष्टाचार मुक्त पारदर्शक व्यवस्था, निर्यातभिमुख धोरण, कर व कायदे, आर्थिक तूट आणि कायदेमोड यावर लक्ष केंद्रीत केल्यास भारताची अर्थव्यवस्था सुधारेल कारण भारतातही परिस्थिती सुधारण्यास बराच वाव आहे. त्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेला काही उपाय कठोरपणे अवलंब करावे लागतील.

**उपाय योजना** :–

1. औद्योगिक क्षेत्रातील कर कमी करावे लागेल. तसेच आजारी उद्योगांना प्रोत्साहन द्यावे लागेल.
2. संशोधन व उच्चशिक्षण क्षेत्रात गुंतवणूक वाढविली पाहिजे.
3. देशातील वित्तीय तूट भरून काढण्यावर भर दिला पाहिजे.
4. शेतकऱ्यांना अत्याधुनिक सोयी व प्रशिक्षण देवून कृषी उत्पादकता वाढविणे.
5. औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे.
6. निर्यात वाढवून आयात कमी करणे.
7. बॅकाचा पतपुरवठा अगदी सुक्ष्म उद्योगापर्यंत नेणे.
8. रोजगार निर्मितीवर जोर देणे.
9. थ्क्प चा आराखडा तयार करणे
10. राजकोषीय निती, केंद्रिय बॅकेची मौद्रिक निती, देशातील राजकीय अस्थिर वातावरण यात सुधारणा करणे.
11. स्कंध बाजारातील विदेशी गुंतवणूकदरांवरील निर्भरता कमी करावी.
12. कौशल्य विकास व व्यवस्थापन सक्रीय करणे.
13. जागतीक व राष्ट्रीय पातळीवर भारताला अत्यंत जागरूक व सक्रीय राहणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ सूची** :–


1. www.businessstandard.com
2. www.sometimes tradeindia.com
3. RBI Annual Report 2012-13
4. Monetery Theory and Practice - RPM Sundabarm sultanchand & Sons
5. योजना मासिक – ऑगष्ट – 2010
6. जागतीक अर्थकारण – अमेरिका एक महासत्ता – डॉ. मधुसुदन साठे
7. दैनिक वृत्तपत्र लोकमत, जूलै, 2014

# सामाजिक आरोग्य विकासात राष्ट्रिय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या योगदानामध्ये जनतेची जबाबदारी व सामाजिक कर्तव्य विषयक समस्या

**प्रा. सुधाकर माटे**, सहा. प्राध्यापक, महिला कला महाविद्यालय, उमरेड

जनतेच्या गरजेनुसार कृतियोजना व कार्यवाही हा ग्रामीण आरोग्य अभियानाचा केंद्रबिंदु आहे. ह्याचाच एक भाग म्हणून 3,61,000 गावात ग्रामीण पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीत जनतेचा सहभाग व त्यांचे स्वामित्व वाढविण्यासाठी देशात विविध 26,000 आरोग्य संस्थामध्ये ''रूग्ण कल्याण समित्यांची'' स्थापना करण्यात आली आहे. अशा आरोग्य संस्थाना/रूग्णालयांना ह्या माध्यमातून एकत्रित वार्षिक निधी प्राप्त झाला आहे. अशा निधीतून रूग्णालयाच्या बऱ्याच गरजा भागल्यामुळे रूग्णालयीन सेवेचा दर्जा वाढलेला आहे.

अशा कार्यवाहीमुळे विविध सामाजिक घटकांचे आरोग्य सेवे वरील सनियंत्रण बळकट होण्यास मदतच झाली आहे. ह्यामुळे समाजातील घटक लोकांच्या आरोग्य विषयक गरजा, त्यांची केली जाणारी पूर्तता, आरोग्य सेवांची गुणवत्ता व परिणामकारकता, आरोग्य सेवेतील उणीवा ह्याचे सतत नियंत्रण करू शकतात. रूग्णालयात दिल्या जाणाऱ्या सेवा, कार्यक्षेत्रात गावोगावी दिल्या जाणाऱ्या सेवा व संदर्भ सेवा ह्यांचे जाणीवपूर्वक संनियत्रण ह्यामुळे शक्य होणार आहे व होत आहे.

सामाजिक संनियत्रणामुळे खालील बाबींची पूर्तता होणे अपेक्षित आहे.

1. समाजाच्या गरजांची बिनचूक माहिती नियमितपणे व सुसंबध्दपणे मिळणे आवश्यक आहे जेणेकरून योग्य नियोजन करणे शक्य होईल.
2. स्थानिक नागरिकांची अपेक्षेप्रमाणे आरोग्य सुविधा/सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक गरजानुसार निकष तयार करणे आवश्यक आहे.
3. जनतेच्या गरजेप्रमाणे आरोग्य सेवा मध्ये वेळोवेही योग्य ते बदल होणे आवश्यक आहे.
4. आरोग्य सेवेच्या नियोजनामध्ये समाज व लोकप्रतिनिधींना संपूर्ण सहभाग असला पाहिजे व त्यांना तशा संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. अशाने सर्वच कार्यक्रम अंमलबजावणीत ही लोकांचा सहभाग वाढण्यास मदत होईल.
5. अशाने आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत कामांची पडताळणी होण्यास मदत होईल.

समाजाकडुन संनियत्रण ह्या संकल्पनेत संनियंत्रणा बरोबरच योग्य वेळी व योग्य ठिकाणी आवश्यक ति उपाययोजना करण्याचे अधिकार ही संबंधित सामाजिक घटकांना असणे आवश्यक आहे. अशा घटकांकडून मिळालेली माहिती व मासिक अहवालातील माहिती ह्यांची एकमेकांशी पडताळणी होणे आवश्यक आहे. ह्यामुळे संपूर्ण आरोग्य सेवेला योग्य त्या उपाययोजना वेळीच करणे सुलभ होईल. आरोग्य सेवा यंत्रणेत काही दोष निर्माण झाल्यास ते वेळीच लक्षात आणण्यासाठी योग्य असे निर्देशांक असणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही विविध स्तरावर कार्यरत असलेल्या समित्यामार्फत होऊ शकते. अशा समित्यांमध्ये सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व शासकिय अधिकारी/कर्मचारी असणे अपेक्षित आहे. अशा समित्यांच्या सभा नियमितपणे होऊन योग्य त्या उपाययोजना होऊ शकतील अशा समित्यां मार्फत समाजाच्या गरजांचे सतत सनियंत्रन होऊन त्याप्रमाणे सुधारित नियोजन होणे अपेक्षित आहे. असे सनियंत्रण प्रत्यक्ष भेटी, कर्मचाऱ्यांचे मासिक अहवाल ह्या माध्यमातून करता येणे शक्य आहे. ह्या सर्वाची परिणती आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीत लोकांचा सहभाग वाढण्यात होईल.

समाजाचा सर्व आरोग्य कार्यक्रमात सहभाग वाढविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत उपलब्ध आरोग्य सेवांची सविस्तर माहिती समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. अशी माहिती मिळाली तरच समाजाला त्याचा फायदा होऊ शकेल व समाज त्यांची गरज, उपलब्ध सेवा, त्यांची गुणवत्ता, उपयुक्तता, विस्तार ह्या बाबत त्याची मते देऊ शकेल व अशा मतांच्या आधारे आरोग्य सेवेची गुणवत्ता वाढविण्याबाबत कार्यवाही करता येणे शक्य होईल.

**संदर्भसुची :–**

1. आरेग्य पत्रिका जुलै, 2010.
2. आरोग्य पत्रिका डिसेंबर 2011.
3. आरोगय पत्रिका एप्रिल, 2011.
4. आरोग्य पत्रिका मार्च, 2009.
5. आरोग्य आणि समाज, प्रा. पि.के. कुलकर्णी

# महिला आणि राजकारण

**प्रा. डॉ. संपदा एस. कुल्लरवार, राज्यशास्त्र विभाग,** विमेन्स कॉलेज, नंदनवन, नागपूर.

स्त्री आणि पुरूष ही समाजरूपी रथाची दोन चाके आहेत. ही दोन्ही चाके जर आपआपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पेलून आव्हाने स्विकारीत असतील तर त्यासमाजाचा निश्चितच योग्यपणे विकास होवू शकतो. परंतू परंपरावादी भारतीय संस्कृतीत हे शक्य झाले नाही. कारण भारतात सर्व काळातील सामाजीक व राजकीय व्यवस्थेतील स्त्रियांची स्थिती नेहमी चर्चेचीच बाब ठरली आहे. कोणात्याही आधुनिक राजकीय समाजाचे आधुनिकतेचे मापण त्यासमाजातील स्त्रियांना प्राप्त झालेले राजकीय स्थान व समान संधीची उपलब्धता यातूनच होत असते.

**प्लेटोसारख्या** विचारवंताने स्त्रीयांच्या क्षमतांचा योग्य उपयोग करून घेवून त्यांना जीवनाच्या सर्व वाटांवर पुरूषांच्या बरोबरीचे स्थान व हक्क दिले पाहिजेत असे सुचवले आहे. स्त्रीयांना घराच्या चार भिंतीत जखडून ठेवल्याने त्यांना अनुत्पादक कामात गुंतविल्या जाते व त्यामुळे त्यांचा व्यक्तीमत्व विकास खुंटल्या जातो. भारतासारख्या खंडप्राय देशात एकूण लोकसंख्येतील निम्म्या लोकसंख्येच्या क्षमतांचा व सेवांचा उपयोग उत्पादक कामांसाठी करून घेतला जात नाही. **बेगम अबीदा** यांनी तर स्त्रीयांना महान म्हंटले आहे. कारण त्यांच्या मते जीवनात जे जे चांगले आहे ते निर्माण करण्याचे कार्य स्त्रीया करतात. स्वातंत्र्योतर काळात इंदिरा गांधींनाही स्त्रीयांचे प्रत्येक टप्प्यावर शोषण होते या गोष्टीची खंत होतो. या देशातील घातक रूढींनी स्त्रीयांना अपंग बनवण्याचे कार्य केले. यासर्वामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते.

**स्त्रीयांच्या राजकीय सहभागाचे स्वरूप** – भारतीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी महिलांच्या क्रियाशील राजकीय सहभागाची अत्यंत आवश्यकता आहे. यापध्दतीने जगाकडे नजर टाकल्यास असे दिसून येते की महीलांना राजकीय मताधिकार याच शतकात प्राप्त झाला. अमेरिकेने 1920 मध्ये, इंग्लंडमध्ये 1928 मध्ये, फ्रान्समध्ये 1944 मध्ये तर स्वित्झर्लंडमध्ये 1971 पर्यंत हे मताधिकार स्त्रियांना प्राप्त झाले. आज संपूर्ण जगत स्त्रियांच्या राजकीय सहभागासाठी प्रयत्नशील असून यादृष्टीने सर्वप्रथम संयुक्त राष्ट्रसंघाने 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून व पुढचे दहा वर्षे महिला दशक म्हणून जाहीर केले.

विशेषतः भारतातील महिलांच्या राजकीय सहभागाचा विचार केल्यास असे दिसून येते की लिंगभेदावर आधारित स्त्री पुरूष असमानता हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्या आहे. पाश्चिमात्य शिक्षण व परकीयांच्या घटनात्मक सुधारणांच्या प्रभावामुळे भारतीय महिलांमध्ये राजकीय जाणीव व जागृती निर्माण झाली. स्वातंत्र्योतर काळात अनेक महिला मंत्री, गव्हर्नर व पंतप्रधान म्हणून नियुक्त झाल्या. यात श्रीमती सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडीत, राजकुमारी अमृत कौर, सुचेता कृपलानी, इंदीरा गांधी, विजयाराजे शिंदे, इ. चा समावेश आहे. काही समकालीन भारतीय राजकीय नेतृत्व कारणाऱ्या महिलांमध्ये शिला दीक्षित, नझमा हेपतुल्ला, सरोज खापर्डे, गिरीजा व्यास, सुषमा स्वराज, सोनीया गांधी, वसुंधरा राजे, मायावती, राबडीदेवी, जयललीता, ममता बॅनर्जी, उमा भारती, ऋतुंबरा इ. चा उल्लेख करता येईल. यावरून असे म्हणता येईल की, महिलांचा राजकीय सहभाग आता अशा ठिकाणावर पोहोचला आहे की, जिथून ते राजकीय अधिकार आणि उच्च राजकीय स्थान यांची ते मागणी करू लागलेले आहे. स्त्रीयांच्या राजकीय सहभागाचा दर्जा वाढावा म्हणून माजी दिवंगत पंतप्रधान श्री. राजीव गांधींनी प्रयत्न केले व याचा परिणाम पंचायत राज व्यवस्थेत म्हणजेच स्थानीकक स्वराज संस्थेत स्त्रियांना 33 टक्के आरक्षण प्राप्त होवू शकले पण हे मिळूनही स्त्रीया समाधानी नव्हत्या व म्हणून 4 मार्च 2011 ला महाराष्ट्र राज्याने स्थानीक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 50टक्के आरक्षण जाहीर केले.

**सहभागाचे प्रमाण** :– अनेक महिला चळवळींनी केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेत सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न न करता राष्ट्रीय पातळीवर महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केले. आता काही प्रमाणात यश येत असून या प्रयत्नांना पुरूषांकडून होणारा विरोध काही प्रमाणात कमी होत आहे. असे असले तरी प्रत्यक्षात मात्र स्त्रियांचा प्रत्यक्ष कृतीशील राजकारणातील सहभाग अत्यंत अल्प राहीला आहे. लोकसभेतील तिचे प्रमाण 30 टक्क्यापासून 8 टक्क्यांवर गेलेले आहे. तर राज्यसभेत ते प्रमाण 7 टक्क्यापासून 10 टक्केपर्यंत वाढलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधे मात्र ही संख्या 33 टक्के आरक्षणामुळे वाढलेली आहे.

राजकारण हे पुरूष प्रधान असल्यामुळे स्त्रियांनी जास्तीतजास्त प्रमाणात राजकारणात सहभागी होणे आवश्यक आहे कारण निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी झाल्याशिवाय स्त्रियांची परिस्थिती बदलू शकत नाही. स्त्रीयांच्या मतांना राजकीय पक्षाकडून व समाजाकडून

विशेष महत्व दिले जात नाही. राजकीय पक्ष महिला उमेदवारांची भरती करण्यास उत्सुक नसतात. आर्थिक परावलंबित्व व निवडणूकीचा प्रचंड खर्च हे राजकीय जीवनात महिला सहभाग वाढविण्यास मोठे अडसर ठरलेले आहेत. स्त्रीया स्वतःसाठी व पक्षासाठी पैसा उभारु शकत नाही. स्त्रीयांचा सहभाग वाढण्यासाठी काही उपाय करणे आवश्यक आहे.

**उपाययोजना :–**

1) सर्वप्रथम रूढी परंपरा जात, धर्म यांनी स्त्रियांची बनवलेली 'चूल आणि मूल' ही मर्यादीत भूमिका सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून बदलवली पाहिजे व स्त्रीयांची मानसिक तयारी घडवून आणली पाहिजे. त्यासाठी सामाजिकरणाच्या प्रक्रियेशी संबंधीत सर्व घटक संस्था, कुटुंब, स्त्री पुरूष धर्म, जातीव्यवस्था यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

2) स्त्रीयांची राजकारणातील रूची वाढविण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे गरलेचे आहे. तरच त्या नेतृत्व करू शकतील. निर्णयप्रक्रियेत सहभागी होवू शकतील.

3) समाजात स्त्रियांना मिळणारे गौन स्थान हे तिला सामाजिक व राजकीय जीवनात सहभागी होण्यास नाउमेद करणारे आहे.

4) सामान्य स्त्रिया सरकार, अधिकार, कायदे यंत्रणा या शब्दांना उच्चारण्याचे टाळतात व त्यापासून दूर पळण्याचा प्रयत्न करतात.

5) सार्वजनिक सभांतून भाषण देणे राजकीय कार्यात वेळ देणे, म्हणजेच व्यक्तीगत जीवन गमावणे व सत्ताधारण करणे यासारखे आहे. म्हणूनच त्यांच्यासाठी त्यांच्यात रूची निर्माण करणे आवश्यक आहे.

6) नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना देखील आर्थीक स्वातंत्र्य नाही. अशा स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी स्वातंत्र्यरित्या निवडणूक लढविणाऱ्या स्त्रीयांना स्वयंसेवी संघटनांनी पाठींबा दिला पाहिजे.

7) सुरवातीला 30 टक्के आणि आता 50 टक्के राखीव जागांचे धोरण हे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांपुरते मर्यादेत न ठेवता प्रतिनिधीत्वाच्या सर्वच पातळयांवर असले पाहिजे. स्त्रीयांना राजकारणासंबंधीची व राजकीय प्रक्रियेची त्यांच्यावर होणाऱ्या परिणामाची जाणीव करून देणे आवश्यक आहे व यादृष्टीने शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यासाठी 100 टक्के स्त्रिया शिक्षित झाल्या पाहिजेत. शिक्षणातून त्यांना राजकीय शिक्षण दिले पाहिजे. शिकलेल्या निर्वाचित महिला आत्मविश्वासाने निर्णय प्रक्रियेत सहभागी होतील.

8) या सर्वांसाठी प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. स्त्रीयांची भूमिका बदलविण्यास प्रसारमाध्यमे महत्वाचे कार्य करू शकतात.

सर्वात शेवटी स्त्रियांना अगदी राष्ट्रीय पातळीपासून तर तळागाळापर्यंत एक जाळे विणण्याची गरज आहे. एकजुटीने आधीच अस्तित्वात असलेल्या जाळयांवर प्रभाव टाकून परिवर्तन घडवणे शक्य आहे. हा सकारात्मक कार्यात्मक दृष्टिकोन वाढविणे गरजेचे आहे व त्यात प्रत्येक स्त्रीयांचा सहभाग आवश्यक ठरतो.

---

**संदर्भग्रंथ :–**


1. डॉ. सुनंदा अहिरे – 'स्त्री – ''अभ्यासाच्या दिशा'',
2. प्रा. डॉ. उषा साळुंके, दिशा' *अथर्व पब्लीकेशन धूळे*
3. डॉ. विजय निंबाळकर (संपादीत) – 'सबला' जी. के इन्स्टीटयूट मौनी विद्यापीठ, गारगोटी, महाराष्ट्र,
4. डॉ. शुक्ला ए. के. – पोलीटीक्स स्टेटस् ऑफ वुमेन ''ए.पी.एच. 'पब्लीशींग कारपोरेशन, न्यू दिल्ली.
5. शरदचंद्र बडोदेकर – राजकारणात स्त्रियांचा सहभाग' रूप आणि प्रक्रिया कुमूद मोरे सक्रीय ऐक्टेशंन 1993, नवी दिल्ली.
6. लिमये अनुसूया – स्त्रीचे समाजातील स्थान व भूमिका'', विश्वकर्मा मुद्रणालय, धूळे.

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &
SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657